POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614




मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक


○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-२८ ● मुंबई, शनिवार, ३० ऑगस्ट २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

# मराठे मुंबईत घुसले अन जामही केले

## मनोज जरांगेंच्या पत्रकार परिषदेतील 10 महत्त्वाचे मुद्दे



■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी आजपासून मुंबईच्या आझाद मौदानावर आमरण उपोषण सुरु केलं आहे. कोणत्याही परिस्थितीत आरक्षण घेतल्याशिवाय आतामुंबई सोडणार नसल्याची भूमिका मनोज जरांगे पाटील यांनी घेतली आहे. सरकारनं मराठा समाजाला आरक्षण द्यावे असं जरांगे पाटील म्हणाले. उपोषणाला एकेक दिवस मुदवाढ देण्यापेक्षा कायमस्वरुपी दिली तरीही हे उपोषण निर्णय होईपर्यंत सुरु राहणार असल्याचे जरांगे म्हणाले. मनोज जरांगे पाटील यांच्या पत्रकार परिषदेतील महत्वाचे दहा मुद्दे.

### निर्णय होईपर्यंत उपोषण सुरु राहणार

आजपासून मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी मुंबईच्या आझाद मैदानावर आमरण उपोषण सुरु केले आहे. हे उपोषण आरक्षणाचा निर्णय होत नाही तोपर्यंत सुरु राहणार असल्याची भूमिका मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे. सरकारच्या हातात आहे की, आंदोलन मोडायचे की मला गोळ्या घालायच्या असेही जरांगे पाटील म्हणाले.

### मी बलिदान देण्यासाठी तयार

मी मराठा समाजासाठी बलिदान देण्यासाठी तयार असल्याचे मनोज जरांगे पाटील म्हणाले. माझे बलिदान गेल्यानंतर तुम्ही मराठा समाजाला आरक्षण द्या असेही मनोज जरांगे पाटील म्हणाले. पण तुम्ही त्यांना इथं त्रास देऊ नका असे जरांगे म्हणाले.

### सरकार आडमुठ्यात घुसले की मराठेही आडमुठ्यात घुसतील

आम्ही सरकारला सहकार्य करत आहोत, सरकारनेही आम्हाला सहकार्य करावं असे मत मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केले. पण जर सरकार आडमुठ्यात घुसले तर मराठेही आडमुठ्यात घुसतील असा इशारा जरांगे यांनी दिला. मराठे घुसले पण जम केले पण असे जरांगे म्हणाले. जाम केलेली मुंबई मोकळी करण्याची मी आंदोलकांना विनंती केली होती. त्यानंतर आम्ही सगळी वाहने काढल्याचे मनोज जरांगे पाटील म्हणाले.

### शांतता आणि संयम पाळा

मी सर्वांना विनंती करतो की, सर्वांनी शांतता आणि संयम पाळा. कोणतही चुकीचं पाऊल उचलू नका असे आवाहन मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आंदोलकांना केलं. रस्तायवर जर कोणी गाड्या लावल्या असतील तर त्या गाड्या काढा, दिलेल्या जागेतच पार्किंग करा असे आवाहन जरांगे यांनी केले.

### आम्हाला त्रास दिला तर बदला होणार

मराठा आंदोलकांना जर मुंबईत त्रास दिला तर आम्ही देखील तुम्हाला त्रास देणार. तुम्ही मुंबईत आम्हाला अशी वागणूक दिली तर तुमच्या आणि तुमच्या नेत्यांच्या सभेतसुद्धा असेल होईल असा इशारा जरांगे यांनी दिला. आम्हाला त्रास दिला तर बदला होणार असे जरांगे म्हणाले. आम्ही मुंबईत आलो म्हणून हॉटेल बंद ठेवले आहेत. जनमताला तुम्हाला किंमत द्यावी लागेल असे जरांगे म्हणाले.

### मुख्यमंत्र्यांची इच्छा पूर्ण होणार

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची इच्छा पूर्ण होणार, कारण त्यांना मुंबईत कानाकोपऱ्यात मराठे दिसणार असल्याचे मनोज जरांगे पाटील म्हणाले. तुम्हाला जे अपेक्षीत आहे ते होणार आहे. पण आम्ही आरक्षण घेणार असल्याचे जरांगे पाटील म्हणाले.

### तुम्ही वेळ लावला तर आणखी मराठी मुंबईत येणार

सरकारने जर मराठा आरक्षण देण्यास वेळ लावला तर आणखी मराठे मुंबईत दाखल होणार असल्याचे मनोज जरांगे पाटील म्हणाले. काम सोडून लोक मुंबईत दाखल होती असे जरांगे पाटील म्हणाले. आज आंदोलनाचा पहिला टप्पा पडला आहे. असे सात आठ टप्पे असल्याचे मनोज जरांगे पाटील म्हणाले.

### सरकारनं आमच्याकडे चचेर्साठी यावं, आम्ही जाणार नाही

सरकारकडे आम्ही चचेर्साठी जाणार नाही, सरकारनं आमच्याकडे यावं असे मत मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केले. सरकारला मराठ्यांचं वाटोल खरायचं असल्याचे जरांगे म्हणाले. दीडशे वर्षांच्या आमच्या नोंदी सापडल्या असल्याचे जरांगे म्हणाले.

### जेलमध्ये टाका, गोळ्या घाला, तरीही उपोषण करणारच

तुम्ही जर मला जेलमध्ये टाकलं तरीही मी उपोषण करणारच असल्याची भूमिका मनोज जरांगे पाटील यांनी घेतली. आरक्षण मिळाल्याशिवाय आता माघार नसल्याचे जरांगे म्हणाले. तुम्ही गोळ्या घातल्या तरी मी झेलणार असल्याचे जरांगे म्हणाले.

### ओबीसींचे आरक्षण काढून आम्हाला द्या असे म्हणणार नाही

ओबीसींचे आरक्षण काढून आम्हाला द्या असे म्हणणार नाही असे जरांगे म्हणाले. ओबीसींना 32 टक्के आरक्षण आहे. त्यामध्ये आमच्या नोंदी आहेत असे मनोज जरांगे म्हणाले. आमच्या सरकारी नोंदी आहे. आम्ही कोणाचेही घेत नाहीत. हे सर्व गरिब ओबीसींना कळाले आहे. सरकार म्हणत आहे की, एकाचं काढून दुसऱ्याला देणार नाही, पण आमचटे हक्काचे आरक्षण त्यामध्ये असल्याचे जरांगे म्हणाले.

## मुंबईत मराठा आंदोलनाला गालबोट; सीएसएमटी परिसरात आत्महत्येचा प्रयत्न



मुंबईत आज सकाळपासून मराठा आंदोलकांचा प्रचंड उत्साह पाहायला मिळत असून मंत्रालय आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस परिसर भगव्या झेंड्यांनी गजबजून गेला आहे. सकाळपासून मोठ्या संख्येने मराठा बांधव मुंबईत दाखल झाले असून आंदोलनाचा जोर वाढत चालला आहे. मात्र या आंदोलनादरम्यान सीएसएमटी स्थानकाबाहेर मोठा गोंधळ उडाला. एका मराठा तरुणाने अंगावर डिझेल ओतून आत्महत्येचा प्रयत्न केला. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. पण पोलिसांनी आणि आजूबाजूच्या नागरिकांनी वेळीच हस्तक्षेप करत त्या तरुणाला थांबवले, त्यामुळे मोठा अनर्थ टळला. मुंबईत सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे आझाद मैदान चिखलमय झाले आहे. पाणी साचल्याने आंदोलकांना अडचणींचा सामना करावा लागत असला तरी त्यांचा उत्साह कमी झालेला नाही. पावसापासून बचावासाठी आंदोलक विविध ठिकाणी आसरा घेत होते. आझाद मैदानाची क्षमता संपल्यानंतर मराठा आंदोलकांनी सीएसएमटी, चर्चगेट परिसर गाठला असून तिथेही मोठी गर्दी झाली होती. मुंबईत सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे आझाद मैदान चिखलमय झाले होता. पाणी साचल्याने आंदोलकांना अडचणींचा सामना करावा लागत असला तरी त्यांचा उत्साह कमी झालेला नाही.आझाद मैदानाची क्षमता संपल्यानंतर मराठा आंदोलकांनी सीएसएमटी, चर्चगेट परिसर गाठला असून तिथेही मोठी गर्दी झाली होती. सीएसएमटी स्थानकाबाहेर आंदोलकांनी हलगीच्या तालावर जल्लोष केला. 'एक मराठा लाख मराठा' अशा घोषणाबाजीत परिसर दुमदुमला. आंदोलकांनी सेल्फी आणि व्हिडिओ काढत एकजुटीचा संदेश दिले.

## कल्याणमध्ये १३ हजार घरगुती मूर्तींचे विसर्जन

### श्री गणेशोत्सवासाठी केडीएमसीची जय्यत तयारी



■कल्याण । प्रतिनिधी,

गणेश चतुर्थीच्या दिवशी श्री गणेशाची पूजा अर्चा करून दीड दिवस मनोभावे भक्ती करून गुरुवारी गणरायांना भक्तिभावात निरोप देण्यात आला. ढोल ताशांच्या गजरात वाजत गाजत मिरवणूक काढत गणपतीचे विसर्जन करण्यात आले. कल्याणच्या गणेश घाट तसेच इतर विसर्जनस्थळी गणेश भक्तांची गर्दी दिसून आली. कल्याण परिमंडळ ३ अंतर्गत दीड दिवसांच्या १ सार्वजनिक तर सुमारे १३ हजार २० घरगुती गणपतींचे विसर्जन करण्यात आले. या वर्षीच्या गणेशोत्सवासाठी महापालिकेने जय्यत तयारी केली असून महापालिकेच्या विद्युत विभागामार्फत श्री गणेशोत्सव काळात नागरीकांची गैरसोय होऊ नये म्हणून ठिकठिकाणी हॅलोजन बसविण्यात आले आहेत. जनरेटरची देखीप व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच टॉवर लाईटिंगची व्यवस्था करण्यात आली असून सीसीटीव्ही कॅमेयांच्या नियंत्रणाखाली देखरेख केली जाणार आहे.

श्री गणेश मुर्तीच्या विर्सजनासाठी नैसर्गिक तलाव, खाडी, कृत्रिम तलाव उपलब्ध असून नागरीकांच्या सोयीसाठी विसर्जन आपल्या दारी ही संकल्पना देखील प्रत्येक प्रशासकीय प्रभागात राबविण्यात येणार आहे. तर या उत्सवासाठी पोलीस प्रशासन देखील सज्ज असून कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी कल्याण परिमंडळ ३ अंतर्गत १२१ अधिकारी, ६६७ कर्मचारी, १५० होमगार्ड तर २ एसआरपीएफच्या प्लाटून तैनात करण्यात आल्या आहेत.

## लालबागच्या राजाला डॉलरचा हार दान



■मुंबई । प्रतिनिधी,

मुंबईतील प्रसिद्ध गणपती लालबागच्या राजाच्या दर्शनासाठी गणेशोत्सवाच्या पहिल्याच दिवशी भाविकांनी प्रचंड गर्दी केली. देश-विदेशातून आलेल्या भक्तांनी नवसापोटी मोठ्या प्रमाणावर दान अर्पण केले. पहिल्याच दिवशी लाखो रुपयांची रोकड जमा झाली असून दानपेटीत सोने-चांदी व परदेशी चलन मोठ्या प्रमाणात मिळाले आहे. विशेष म्हणजे भाविकांकडून आलेला अमेरिकन डॉलर्सचा हार सध्या चचेर्चा विषय ठरला आहे. बँक ऑफ महाराष्ट्राचे कर्मचारी दानपेट्यांतील नोटांची मोजणी करत असून त्यात १०, ५०, १०० आणि ५०० रुपयांच्या नोटांसह परदेशी नोटाही आढळल्या. लालबागच्या राजाला भाविकांकडून मिळालेल्या दानामध्ये दोन लाख रुपये किमतीचा सोन्याचा मोदक, सोन्याची पावपले, हार, मुकुट, अंगठ्या, नाणी, सोन्याचे गणपती तसेच एक किलो वजनाची चांदीची वीट, चांदीचे मोदक, गणपती, मुकुटं, हार, पाळणे, समया आणि फुलघरे यांचा समावेश आहे. याशिवाय कोट्यवधी रुपयांची रोकड आणि अगदी क्रिकेट बॅटसुद्धा दानपेटीत मिळाली आहे.

## टीओडी मीटरमध्ये छेडछाड,दोन घटना उघडकीस



■कल्याण । प्रतिनिधी,

महावितरण कडून राज्यात जुने मीटर काढून नवीन टीओडी मीटर(टाईम ऑफ डे ) लावण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मीटर मध्ये छेडछाड करण्याच्या दोन घटना कल्याण परिमंडळातील बदलापूर आणि वसई येथे उघडकीस आल्या आहे. कल्याण परिमंडळात देखील मोठ्या प्रमाणात वीज ग्राहकांचे जुने मीटर बदलून नवीन टीओडी मीटर लावले आहेत. वीज देयक कमी यावे यासाठी काही ग्राहक मीटरमध्ये छेडछाड करीत असतात. पण प्रत्यक्षात सकाळी ९ ते संध्याकाळी ५ या वेळेत वीज वापर करणाया ग्राहकांना ८० पैसे प्रति युनिट सुट मिळते आहे. महावितरण कडून लावण्यात येणाऱ्या टीओडी मीटरमध्ये छेडछाड करणे अवघड झाले आहे. नवीन टीओडी मीटरमध्ये कम्युनिकेशन पोर्ट लावले असल्याने ग्राहकाच्या क्षणाक्षणाच्या वीज वापराची माहिती महावितरण यंत्रणेला मिळत असते. जर ग्राहकांने यात छेडछाड केली तर त्या ठिकाणी जाऊन मीटरची तपासणी करून खात्री करण्यात येते.या टीओडी मीटरमध्ये छेडछाड केली तर वीज बिल कमी होण्या ऐवजी ते वाढले आहे.महावितरणच्या बदलापूर आणि वसई उपविभागातील गुणवत्ता नियंत्रण विभागाने अशा संशयित ग्राहकांच्या वीज वापरावर लक्ष ठेवले होते. प्रत्यक्ष ग्राहकाचे मीटर लावले त्या ठिकाणी जाऊन तपासणी केली असता यात छेडछाड केल्याचे आढळून आले. अशा ग्राहकांच्या विरोधात पोलीस तक्रार करण्याची कारवाई महावितरण कडून देण्यात सुरू झाली आहे.वीज मीटर मध्ये छेडछाड करणे हा दंडनीय अपराध आहे. वीज चोरी करणाऱ्यास कठोर कारावास किंवा आर्थिक दंडाची तरतूद वीज कायद्यात करण्यात आली आहे. जर महावितरणच्या टीओडी मीटरमध्ये छेडछाड करीत असल्याचे आढळून आल्यास जवळच्या महावितरण कार्यालयात संपर्क साधावा, असे आवाहन मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा यांनी केले आहे.

## पंजाबमध्ये महापुराचा कहर! मदतीसाठी लष्करही पोहोचले



■चंदीगड । प्रतिनिधी,

उत्तर भारतातील अनेक राज्यांमध्ये सततच्या पावसामुळे पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. पंजाब राज्य गेल्या तीन दिवसांपासून पुराच्या विळख्यात आहे. राज्यातील सर्व शाळा ३० ऑगस्टपर्यंत बंद ठेवल्या आहेत. याशिवाय पावसामुळे जम्मू काश्मीरमध्ये अडकलेल्या ३ हजार लोकांना वाचवले आहे. या पूरस्थितीमुळे पंजाबमधील पठाणकोट, गुरुदासपूर, तरणतारन, होशियारपूर, कपूरथळा, फिरोजपूर आणि फाजिल्का हे जिल्हे सर्वाधिक प्रभावित झाले आहेत. या ७ जिल्ह्यांतील ३५० हून अधिक गावे ५ ते ७ फूट पाण्याखाली गेली आहेत. परिस्थिती अत्यंत गंभीर झाल्याने सैन्याच्या हेलिकॉप्टर आणि वाहनांच्या मदतीने बचावकार्य हाती घेतले. चिनूक हेलिकॉप्टरच्या सहाय्याने पाण्यात अडकलेल्या लोकांना सुरक्षित स्थळी हलवले जात आहे. काल एकाच दिवशी ६ हजारांहून अधिक लोकांना सुरक्षित स्थळी हलवले. जम्मू काश्मीरहून रेल्वेने विशेष सेवा सुरु करून दोन विशेष गाड्यांद्वारे पर्यटकांना त्यांच्या गंतव्यस्थानी रवाना केले. यामध्ये एक रेल्वे जम्मूहून वाराणसी आणि दुसरी नवी दिल्लीकडे रवाना झाली. दोन्ही गाड्यांत प्रत्येकी १,५०० हून अधिक प्रवासी होते. दिल्लीतील यमुना नदीने २०५.४५ पोहचून धोक्याची पातळी ओलांडली. उत्तर प्रदेशातील वाराणसीसह १७ जिल्ह्यांत पूरपरिस्थिती निर्माण झाली. प्रयागराजमध्ये गंगा आणि यमुना नद्यांची पातळी ८४.७३ मीटरच्या जवळ पोहोचल्याने या महिन्यात दुसऱ्यांदा पूराचे पाणी घरांमध्ये शिरले. संगम परिसरात रस्त्यांवर बोटी चालू लागल्या आहेत. आसामच्या गुवाहाटीमध्ये मुसळधार पावसामुळे अनेक रस्ते जलमय झाल्याने वाहतूक ठप्प झाली.

## मराठवाड्यात पूरस्थितीमुळे जनजीवनविस्कळीत!



■बीड । प्रतिनिधी,

मराठवाड्यात गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पावसाने पुन्हा कहर केला. यामध्ये नांदेड , लातूर आणि बीड जिल्ह्यांमध्ये पूरस्थितीमुळे जनजीवन विस्कळीत झाले. मुसळधार पावसामुळे नद्यांना पूर आल्याने अनेक गावांचा संपर्क तुटला. अनेक रस्ते पाण्याखाली गेले. शेतांमध्ये पाणी शिरल्याने शेतीचेही प्रचंड नुकसान झाले. प्रशासन दक्ष असून नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्याचे काम सुरू आहे. नांदेड जिल्ह्यात काल सायंकाळपासून मुसळधार पाऊस कोसळत असल्यामुळे मुखेड, कंधार व नायगाव तालुक्यांमध्ये जनजीवन विस्कळीत झाले. मुखेड तालुक्यातील चांडोळा, येवती, जांब, बाऱ्हाळी, मुक्रमाबाद, अंबुलगा आणि जाहुर यांसह आठ गावांना पावसाचा जबरदस्त फटका बसला. हसनाळ व रावणगाव ही बुडीत क्षेत्रातील गावे पुन्हा पाण्याखाली गेली. कंधार तालुक्यातील हाळदा, भूकमारी, चौकी महाकाय, लाडका, गोणार, देवईचीवाडी, गुंडा, जाकापूर, चिखली अशा २० गावांमध्ये पुराचे पाणी शिरले. लाडका, मानसिंगवाडी, रुई व मोहिदा परांडा या गावांचा संपर्क तुटला. उर्ध्व मन्यार प्रकल्प धरण पूर्ण क्षमतेने भरल्यामुळे त्यातील अतिरिक्त पाणी सोडले. सध्या ७ दरवाजे उघडले आहेत. कंधारचे तहसीलदार रामेश्वर गोरे यांनी नागरिकांना दक्षतेचा इशारा दिला आहे. नायगाव तालुक्यातील नरसी येथे ११५ मिमी पावसाची नोंद झाली. नरसी ब्र बिलोली मार्ग वाहतुकीसाठी बंद झाला आणि अनेक घरांमध्ये पाणी शिरले. बीड जिल्ह्यातील किल्ले धारूर येथे काल रात्री झालेल्या अतिवृष्टीमुळे वाण नदीला पूर आला. त्यामध्ये धारूर-आसरडोह आणि धारूर-आडस मार्गावरील पूल पाण्याखाली गेले. या पाण्यात चारचाकी व रिक्षा वाहून गेल्याने नितीन कांबळे (४२) यांचा मृत्यू झाला. तर अनिल लोखंडे (२६) हा युवक अद्याप बेपत्ता आहे. लातूर जिल्ह्याच्या सीमेवरील धडकनाळ व बोरगाव परिसरात पुन्हा पूरस्थिती निर्माण झाली. लेंडी नदीच्या उपनद्यांना आलेल्या पुरामुळे परिसरातील शेती व घरे पाण्याखाली गेली. यापूर्वीच्या पुरानंतर केलेल्या पुलाची डागडुजी निष्फळ ठरली. पुन्हा आलेल्या पुरात वाहतूक व्यवस्था पूर्णपणे विस्कळीत झाली. मागील २४ तासात लातूर जिल्ह्यात १०० मिमी पावसाची नोंद झाली.



## संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# जीव टांगणीला



गणरायाच्या आगमनाने सर्वत्र आनंदाचे वातावरण तयार झाले असताच, बुधवारी विरार येथील इमारत दुर्घटनेची बातमी महामुंबईत राहणाऱ्या नागरिकांच्या चेहऱ्यावर दुःखाचे सावट आणणारी ठरली. ३६ तासांच्या अथक बचावकायार्नंतरही त्यात १७ जणांना आपला जीव गमावावा लागला. विरार पूर्वेकडील नारंगी रोडवरील चामुंडा नगर आणि विजयनगरदरम्यान असलेल्या चार मजली 'रमाबाई अपार्टमेंट' या इमारतीची ही दुर्घटना आहे. इमारत संपूर्ण कोसळल्याने बांधकाम साहित्याचे मोठे ढिगारे झाले होते, त्याखाली अडकलेल्यांना बाहेर काढण्यास बचाव कार्यास विलंब झाला. या दुर्घटनेदरम्यान घडलेली एक हृदयद्रावक कहाणी समोर आली. ओंकार जोईल यांच्या पत्नी आणि मुलीचा यात जागीच मृत्यू झाला. वडील ओंकार यांनी मुलीच्या वाढदिवसासाठी घर सजवले होते. केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला. त्याचे फोटो नातेवाइकांना पाठवले. मात्र, केक कापून अवघी पाच मिनिटे झाली नसतील, तोच इमारतीचा एक भाग कोसळून जवळच्या चाळीवर कोसळला. या दुर्घटनेत उत्कर्षा जोईल आणि तिच्या आईचा मृत्यू झाला, ओंकार जोईल यांचा दुर्घटना झाल्यापासून पत्ता लागत नव्हता. अखेर हा मृतदेह दुसऱ्या दिवशी, गुरुवारी सापडला. विरारमध्ये बचाव पथक पोहचली. इमारतीच्या बांधकामात कमी दजार्चे सिमेंट आणि इतर साहित्य वापरले जाते, ज्यामुळे इमारतीची मजबुती कमी होते. इमारतीच्या सांगाड्याला पाणी लागल्यामुळे आणि ओलाव्यामुळे त्याचे बांधकाम कमकुवत होते, असे काही ठिकाणी दिसून आले. मुंबई शहरापासून विस्तारलेल्या ठाणे, भिवंडी, दिवा, वसई-विरार या ठिकाणी इमारती कोसळून यापूर्वी अनेक दुर्घटना झाल्याच्या घटना घडल्या. त्याची मुख्य कारणे अवैध बांधकाम, निकृष्ट दजार्चे साहित्य वापरणे, जीर्ण इमारतींची योग्य देखभाल न करणे आणि निकृष्ट दजार्चे बांधकाम हीच आहेत. विरारमधील रमाबाई अपार्टमेंटच्या दुर्घटनेमध्येही हेच घटक कारणीभूत ठरले. कारण ही इमारत पूर्णपणे बेकायदेशीर होती आणि तिचे बांधकाम निकृष्ट दजार्चे होते. इमारतीत क्षमतेपेक्षा जास्त लोक राहिल्याने किंवा सामानाचा भार जास्त झाल्याने इमारतीवर ताण येतो आणि ती कोसळू शकते. त्याचप्रमाणे अनेक इमारती महापालिकेच्या परवानगीशिवाय बांधल्या जातात. हजारो कुटुंबे जीव मुठीत घेऊन त्यामध्ये राहत आहेत हे वास्तव नाकारून चालणार नाही. कधीकधी ढगफुटीसारख्या अतिवृष्टीमुळे इमारतींच्या पायाला आणि बांधकामाला धोका निर्माण होतो, असेही काही ठिकाणी दिसून येते. विरारमधील या इमारत दुर्घटनेच्या निमित्ताने आणखी एक प्रश्न पुन्हा एकदा समोर आला आहे, तो म्हणजे मुंबईची हद्द सोडल्यानंतर पश्चिमेला नालासोपारा, विरारपर्यंत, तर पूर्वेला ठाणे, उल्हासनगर, डोंबिवली, कल्याण, बदलापूरपर्यंत अनधिकृत इमारती किती आहेत, याचे नव्याने सर्व्हेक्षण करण्याची गरज आहे. मुंबईत राहणारा मराठी माणूससुद्धा कुटुंबासाठी जागा अपुरी पडू लागल्यामुळे, याच भागात गेल्या ३० -३५ वर्षांत स्थलांतरीत झालेला दिसला. काही महिन्यांपूर्वी डोंबिवलीतील बेकायदेशीर इमारती पाडण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले होते. परंतु, या इमारतीमध्ये राहणाऱ्या नागरिकांचा दोष काय? त्यांना अभय मिळावे यासाठी सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांकडून सहानुभूती दाखविण्यात आली होती. वीस ते तीस लाख रुपयांचे कर्ज घेऊन, या अनधिकृत इमारतीत घरे घेणाऱ्यांच्या बाजूने विचार केला, तर माणुसकीच्या दृष्टिकोनातून तो योग्य विचार आहे असे मानायला हरकत नाही; परंतु आपल्याकडे घर खरेदीतील पारदर्शकता, त्याबाबत असलेल्या नियमांकडे नागरिकांमध्ये अनभिज्ञता असल्याने अनेक इमारतींतील घरांची कागदपत्रे बिल्डरकडून केवळ प्रतिज्ञापत्राच्या आधारावर केली जात आहेत.

# हेकेखोरपणा ही एक मानसिकता

अनेकदा आपल्या आजूबाजूलासुद्धा आपण असे लोक बघतो जे कायम स्वतःच खरं करतात. अगदी कोणीही कितीही अनुभवी व्यक्तीने सल्ला दिला, मार्गदर्शन केले तरी काही व्यक्ती ते समजून उमजून घेण्याच्या मानसिकतेतच नसतात. अशा लोकांना स्वतःला स्वतःच्या चुकांचा, अविचारी निर्णयांचा खूप त्रास होतो पण विनाशकाले विपरीत बुद्धी या उक्तीनुसार नुकसान होत असलं तरी ते अजिबात स्वतःमध्ये बदल करत नाहीत. एकदा आजूबाजूच्या सगळ्यांना असे भावनिक, मानसिक ब्लॅकमेल करून आपला कोणताही अट्टाहास पचू शकतो हे सिद्ध झाल्यावर ही व्यक्ती खूप आत्मविश्वासाने स्वतःच्या चुकांचे प्रमाण वाढवत नेते. अशा व्यक्तींच्या चुकांमुळे, चुकीच्या व्यवहारामुळे, वागण्यामुळे त्याचे स्वतःचे शारीरिक मानसिक स्वास्थ्य हरवतेच पण असे लोकं यासाठी मी जबाबदार आहे असं मान्य न करता वेळोवेळी कोणाचेही नाव पुढे करून त्याच्यावर आपल्या अपयशाच खापर फोडतात. हेकेखोरपणा अशा स्वभावामागील मानसिकतेचे सविस्तर कारण आणि त्यांच्या स्वभावामागे असलेल्या घटना या लेखामार्फत आपण जाणून घेणार आहोत. मी म्हणतो तेच खरं अशा व्यक्तींच्या स्वभावात अनेक गुंतागुंतीची मानसशास्त्रीय कारणे दडलेली असू शकतात. बाह्यतः ही व्यक्ती हट्टी, दुर्लक्ष करणारी किंवा अहंकारी वाटू शकते. अशा व्यक्तीमध्ये काही ठरावीक मानसिक वैशिष्ट्ये दिसून येतात ते म्हणजे असुरक्षितता आणि भीती हा एक मुद्दा लक्षात घेण्यासारखा आहे. अशा लोकांच्या मनात एक प्रकारची खोलवर रुजलेली असुरक्षितता असते. त्यामुळे, कोणत्याही कोणाच्याही सल्ल्याला किंवा मार्गदर्शनाला ते स्वतःवरचा हल्ला मानतात आणि त्याला विरोध करतात. त्यांच्या मते, दुसऱ्याचे मार्गदर्शन स्वीकारणे म्हणजे स्वतःची कमी कबूल करण्यासारखं आहे. दुसरे म्हणजेच नियंत्रण गमावण्याची भीती यांच्यामध्ये असते. दुसऱ्यांनी दिलेला सल्ला स्वीकारणे म्हणजे आपल्या आयुष्याचा ताबा दुसऱ्यांच्या हातात देण्यासारखं त्यांना वाटतं. ही नियंत्रण गमावण्याची भीती इतकी जास्त असते की, चुकीच्या मार्गावर असूनही ते स्वतःच्याच निर्णयावर ठाम राहतात. 'सत्य' आणि 'मी' यांची एकरूपता हा एक पैलू अशा लोकांमध्ये आढळतो. अशा व्यक्तीसाठी 'सत्य' हे त्यांच्या स्वतःच्या विचारांशी आणि कृतींशी जोडलेलं असतं. त्यांच्या मते, 'मी जे करतोय तेच बरोबर आहे' आणि 'मी जो आहे तोच बरोबर आहे'. त्यामुळे, त्यांच्या विचारांना किंवा कृतींना आव्हान देणे म्हणजे त्यांच्या अस्तित्वालाच आव्हान देणे होय. जर कोणी त्यांच्या



मताला, विचारांना, निर्णयाला आडवं गेलं, विरोध केला, त्यांना जे आवडत नाही, पटत नाही ते केल तर हे लोक त्यांच्याशी संपर्क तोडतात. त्यांच्या मनाविरुद्ध वागणारी जितकी लोक असतील त्यांच्यामध्ये फूट पाडण्यासाठी हे पूर्ण प्रयत्न करतात. आपल्या भूमिकेच्या आड येणारे आपले शत्रू आहेत, विरोधक आहेत अशी त्यांची मानसिकता असते आणि त्यामुळे आपल्या विरोधात अनेक लोकांचे एकमत होऊ नये आणि आपल्यावर सामूहिक हल्ला आपल्या वागणुकीविरोधात होऊ नये यासाठी ते पूर्ण प्रयत्न करतात. आपल्या इच्छेविरुद्ध वागणाऱ्या प्रत्येकाला ते आपला शत्रू मानत असल्यामुळे त्याची इतरांमध्ये बदनामी करणे, त्याच्या बद्दल अफवा पसरवणे, गटबाजी करणे, एखाद्याला एकटे पाडणे, त्याला टार्गेट करणे यातून हे लोकं स्वतःच्या चुकांना झाकण्याचा प्रयत्न करतात.चुका स्वीकारण्याची अक्षमता हा सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा या लोकांना कोणत्याही थराला नेण्यासाठी कारणीभूत असतो. आपल्या चुका मान्य करणे हे एक प्रकारचं मानसिक धैर्य आहे. पण, अशा व्यक्तीमध्ये हे धैर्य नसतं. त्यांना असं वाटतं की चूक स्वीकारणे म्हणजे पराभव स्वीकारणे. स्वतःला आणि इतरांना त्रास झाला तरी, ते या गोष्टी गांभीयार्ने घेत नाहीत कारण त्यांना हे मान्य करायचं नसतं की त्यांची कृती, त्यांचा निर्णय चुकीचा होता. ते अनेक गंभीर गोष्टी उडवून लावतात, जेणेकरून त्यांना आपल्या चुकीचा सामना करावा लागणार नाही. आपल्या चुकीकडे कोणाचे लक्ष जाण्याअगोदर ते या चुकीचं खापर फोडण्यासाठी एखादा बळीचा बकरा शोधून ठेवतात. त्यांच्या नियंत्रणाबाहेर कोणतीही गोष्ट जाते आहे अस लक्षात आल्यास हे लोक ताबडतोब एखादी मन घडत कहाणी रचून इतरांच्या गळी उतरवतात आणि स्वतःची बाजू सुरक्षित करतात. अशा प्रकारच्या मानसिकतेची पाळे मुळे त्या व्यक्तीच्या बालपणात किंवा तिच्या मागील अनुभवांमध्ये दडलेली असू शकतात त्यावर नजर टाकणे गरजेचे आहे. बालपणीचे आघात यामागील जटील कारण आहे. काही व्यक्तींना बालपणी खूप टीका किंवा अपमान सहन करावा लागला असेल तर असे होऊ शकते. त्यांच्यावर वारंवार टीका झाल्यामुळे त्यांच्या मनात 'मी कधीच पुरेसा नाही' अशी भावना निर्माण होते. या भावनेपासून स्वतःचे रक्षण करण्यासाठी ते एक बचावात्मक कवच तयार करतात, ज्यामुळे ते कोणाचंही ऐकत नाही. आपलंच खरं करून स्वतःला कायम बरोबर आणि खरं सिद्ध करणे त्यांच्यासाठी रोजची लढाई असते. कमी 'आत्मसन्मान' असणे. कमी आत्मसन्मान असणाऱ्या व्यक्तींना असं वाटतं की ते चुकीचे आहेत किंवा कमी आहेत. या असुरक्षिततेतून बाहेर पडण्यासाठी ते स्वतःलाच श्रेष्ठ मानू लागतात. दुसऱ्यांचा सल्ला नाकारून ते तात्पुरती श्रेष्ठत्वाची भावना अनुभवतात. ही एक प्रकारची मानसिक भरपाई असते. कोणाचं काही ऐकून घेणे त्यांना कमीपणा वाटतो. 'नार्सिसिस्टीक व्यक्तिमत्त्वविकार'देखील अशी व्यक्तिमत्त्व घडवण्यासाठी कारणीभूत असतो. काही गंभीर प्रकरणांमध्ये, हे वर्तन 'नार्सिसिस्टीक व्यक्तिमत्त्व विकारा'शी संबंधित असू शकतं. या विकारात, व्यक्तीला स्वतःबद्दल खूप जास्त महत्त्व वाटतं. त्यांना असं वाटतं की ते अद्वितीय आहेत आणि इतरांपेक्षा श्रेष्ठ आहेत. आपल्या आजूबाजूचे सगळे मूर्ख आहेत त्यांना काहीही सांगून दिशाभूल करणे सोपे आहे. या वृत्तीमुळे त्यांना कोणाच्याही सल्ल्याची गरज वाटत नाही. दुसऱ्यांच्या भावना किंवा त्रासाची त्यांना पर्वा नसते, कारण त्यांच्यासाठी फक्त स्वतःचे विचार, हट्ट आणि गरजा महत्त्वाच्या असतात. आपल्या नियमानुसार जग चालले पाहिजे ही त्यांची हटवादी वृत्ती असते. जो आपलं अंधानुकरण करत नाही, जे लोक एकमेकांना विश्वासात घेवून आपल्या कोणत्याही गोष्टीला विरोध करतात त्यांना वाटते त्या लोकांना फोडण्यासाठी, तोडण्यासाठी, वेगळे करण्यासाठी असे लोक वेगवेगळ्या पद्धतीने, प्रकाराने प्रयत्न करतात. 'संरक्षण यंत्रणा' अशा व्यक्ती वारंवार काही विशिष्ट संरक्षण यंत्रणांचा वापर करतात. जसे की 'नकार'.

ते समस्या अस्तित्वातच नाहीये असं मानतात, जेणेकरून त्यांना त्या समस्येचा सामना करावा लागणार नाही. तुम्ही ज्या गोष्टीला समस्या किंवा त्रास म्हणत आहात तो माझ्या लेखी त्रास नाहीच आहे कोणतीही समस्या नाहीच आहे असं ते इतरांना पटवून देतात. कोणतीही चुकीची घटना घडल्यावर पण हे असे झालेच नव्हतेच हे माझ्यामुळे नाही झाले याला कारणीभूत भलतीच व्यक्ती होती. या पद्धतीने पटवून देण्यात हे लोक माहीर असतात. जे कोणी अशा लोकांना काही गंभीर चुकांचे, घटनांचे भविष्यात होणारे गंभीर परिणाम लक्षात आणून देण्याचा प्रयत्न करतो त्याला हे लोक वेसण घालण्याचा प्रयत्न करतात. अशा लोकांकडून अनेकदा त्यांच्या आजूबाजूच्या लोकांना खूप मयार्दा घातल्या जातात, बंधनात ठेवले जाते, इतरांवर लक्ष आणि नजर ठेवली जाते. इतरांचे वागणे, बोलणे कंट्रोल करून इतरांमध्ये फूट पाडून ही व्यक्ती स्वतःला सुरक्षित समजते. प्रत्येकजण माझ्याच बाबतीत माझ्या मागे काहीतरी बोलेल, माझ्याबद्दलच चर्चा होईल, माझ्या विरुद्ध काही नियोजन अथवा कट केला जाईल ही भीती अशा लोकांना कायम वाटतं असते. मी जे करत नाही, मला जे आवडत नाही ते तुम्हीही करू नका, मला जे पटत नाही ते कोणीच करायचं नाही अशी त्यांची अपेक्षा असते. मला जे अपेक्षित नाही त्याबद्दल कोणी आपापसात बोलायच पण नाही यासाठी त्यांचा प्रयत्न असतो. अशा व्यक्तीचा स्वभाव केवळ 'हट्टीपणा' नसून त्यामागे खोलवर रुजलेली असुरक्षितता, भीती आणि मानसिक आघातांशी संबंधित जटिल भावना असू शकतात. हे वर्तन त्यांचे आंतरिक जग सुरक्षित ठेवण्याचा एक मार्ग असतो, भलेही त्यामुळे त्यांना आणि इतरांना त्रास होत असला तरी. अशा व्यक्तीला मदत करण्यासाठी, तिच्या वर्तनाला केवळ 'चुकीचे' ठरवण्याऐवजी, त्यामागची खरी कारणे समजून घेणे महत्त्वाचे असते. अशा व्यक्ती, अशा मानसिकतेमधून जाणारी कुटुंब यांच्यासाठी समुपदेशन, एकमेकांशी मोकळा संवाद साधने, सतत बोलत राहणे, परस्परांना समजावून घेणे गरजेचे आहे. त्यामुळे आपल्या बाबतीत असे कोणी करत असेल अथवा घडतं असेल तर वेळीच जागे होणे, कोणाच्याही खोट्या रचलेल्या मिथ्या ना बळी न पडणे, अशा लोकांच्या सांगण्यावरून आपल्या संपकार्तील चांगली जवळची माणस न गमावणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

# सेमीकंडक्टर उत्पादनांत आत्मनिर्भरता येणार

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतेच राष्ट्राला संबोधित करताना या वर्षाअखेर देशातील पहिली सेमीकंडक्टर चिप उत्पादित होणार असल्याची घोषणा केली. आतापर्यंत परदेशातून सेमीकंडक्टर आयात करून भारताची गरज भागविली जात होती. दहा वर्षांत सेमीकंडक्टर उत्पादनात स्वयंपूर्ण होण्याचा भारताचा निर्धार असून सेमीकंडक्टर निर्यात करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्राला संबोधित करताना देश सेमीकंडक्टरच्या जगात पुढे जात आहे, असे सांगितले. देशात सहा सेमीकंडक्टर युनिट्स आधीच कार्यरत आहेत, तर इतर चार मंजूर झाले आहेत. २०२५च्या अखेरीस ह्यमेड इन इंडिया 'सेमीकंडक्टर चिप्स' बाजारात येतील. सेमीकंडक्टर चिप्ससाठी देशांमध्ये अनेकदा संघर्ष होतो. अशा परिस्थितीत सेमीकंडक्टर चिप म्हणजे काय हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. हा एक सिलिकॉन-आधारित इलेक्ट्रॉनिक घटक आहे, जो कोणत्याही उपकरणाच्या प्रक्रियेत आणि मेमरी स्टोरेजमध्ये वापरला जातो. सोप्या भाषेत सांगायचे तर फोनमध्ये स्थापित केलेली मेमरी चिप त्याचाच एक प्रकार आहे. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात सेमीकंडक्टर चिप्स लहान असूनही खूप उपयुक्त आहेत. त्याशिवाय कोणतेही गॅझेट काम करू शकत नाही. ते मोबाइल, लॅपटॉपपासून वाहन, संरक्षण आणि उपग्रह क्षेत्रात वापरले जाते. तैवान जगात सर्वाधिक सेमीकंडक्टर चिप्स बनवतो. या देशातील टीएसएमसी या कंपनीचा चिप मार्केटमध्ये सुमारे ५० टक्के वाटा आहे. मेमरी चिप्स बनवणारी दक्षिण कोरिया दुसऱ्या क्रमांकावर आहे. सॅमसंग, एसके हायनिक्स यांसारख्या कंपन्या यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. चीनदेखील हळूहळू या क्षेत्रात प्रगती करत आहे. ह्यमीडिया रिपोर्टसह्लनुसार सेमीकंडक्टर चिप्सच्या एकूण उत्पादनात चीनचा वाटा सुमारे १५-२० टक्के आहे. चिपचा शोध अमेरिकेने लावला होता; परंतु आजकाल बहुतेक आशियाई देश त्याचे उत्पादन करत आहे. अशा परिस्थितीत अमेरिकादेखील या क्षेत्रात सतत गुंतवणूक करत आहे.

सर्वाधिक सेमीकंडक्टर चिप्स खरेदी करणाऱ्या देशांच्या यादीत पहिले नाव चीनचे आहे. जे त्याच्या इलेक्ट्रॉनिक बाजारपेठेसाठी एकूण जागतिक खरेदीपैकी एक तृतीयांश खरेदी करते, तर अमेरिका दुसऱ्या क्रमांकावर आहे. भारत त्याच्या गरजेनुसार इतर देशांकडून लागणारे शंभर टक्के सेमीकंडक्टर खरेदी करतो. त्यात तैवान हा सर्वात मोठा पुरवठादार आहे. त्यानंतर चीन, दक्षिण कोरिया, व्हिएतनाम आणि मलेशियाचा क्रमांक लागतो. एका अहवालानुसार भारत स्वतः सेमीकंडक्टर निर्यात करतो. २०२४-२५ दरम्यान भारत अमेरिकेला चिप्स निर्यात करणारा चौथा देश आहे, ज्याचा अमेरिकेच्या एकूण सेमीकंडक्टर आयातीत ७.२ टक्के वाटा आहे. भारत अर्धवाहक उत्पादन आणि नवोपक्रमाचे जागतिक केंद्र बनण्याचे स्वप्न पाहतो, जेणेकरून आयात कमी होईल आणि पुरवठा साखळी मजबूत होईल आणि देशांतर्गत क्षमता वाढेल. सरकारने सेमीकॉन इंडिया प्रोग्राम अंतर्गत या क्षेत्रात सुमारे ७६ हजार कोटी रुपये जारी केले आहेत. आतापर्यंत देशात दहा प्रमुख अर्धवाहक प्रकल्पांना मान्यता देण्यात आली आहे, जिथे ६ प्लांटवर काम सुरू आहे. टाटा इलेक्ट्रॉनिक्स, एचसीएल-फॉक्सकॉन,



मायक्रॉन, वेदांत-फॉक्सकॉन आणि अनेक जागतिक तंत्रज्ञान कंपन्या यात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. भारत २०२५च्या अखेरीस मेड इन इंडिया सेमीकंडक्टर चिप्स लाँच करण्याची तयारी करत आहे. भारत सरकार सेमिकॉन इंडिया फ्युचर स्किल्स टॅलेंट कमिटी च्या अहवालाकडे लक्ष ठेवून आहे. त्यात म्हटले आहे, की २०३२ पर्यंत व्हेरी लार्ज स्केल इंटिग्रेशन चिप डिझाइन क्षेत्रात अंदाजे २,७५,००० अतिरिक्त कर्मचाऱ्यांची आवश्यकता असेल. इतकेच नाही तर, पुढील दहा वर्षांमध्ये फॅब आणि असेंब्ली, टेस्टिंग, मार्किंग आणि पॅकेजिंग सुविधांसाठी अनुक्रमे २५ हजार आणि २९ हजार कुशल कर्मचाऱ्यांची आवश्यकता असेल. ज्याची अंमलबजावणी करण्यास सरकार तयार आहे. दरवर्षी १५ लाखांहून अधिक अभियंत्यांना प्रशिक्षण दिले जाते.

भारतीय अर्धवाहक उद्योगाची सद्यस्थिती आणि भविष्यातील शक्यतांवरील हा अहवाल अलीकडेच कौशल्य विकास आणि उद्योजकता राज्यमंत्री जयंत चौधरी यांनी लाँच केला. अहवालात दावा करण्यात आला आहे, की भारतात दरवर्षी १.५ दशलक्षाहून अधिक अभियंते प्रशिक्षित केले जातात. त्यापैकी तीन टक्क्यांपेक्षा कमी अर्धवाहक उद्योगासाठी कुशल मानले जातात. तथापि, गेल्या काही वर्षांमध्ये भारताने चिप डिझाइनमध्ये बरीच प्रगती केली आहे, परिणामी सव्वा लाखांहून अधिक अभियंते डिझाइन सेवांमध्ये गुंतले आहेत, तरीही फॅब ऑपरेटर, प्रक्रिया तंत्रज्ञ आणि एटीएमपी अभियंत्यांची मोठी कमतरता आहे. संपूर्ण अर्धवाहक मूल्य साखळीसाठी हे कौशल्य आवश्यक आहे. भारत सर्वात वेगाने वाढणाऱ्या डिजिटल अर्थव्यवस्थांपैकी एक आहे आणि अर्धवाहक उद्योग त्यात खूप मोठी भूमिका बजावू शकतो. भारतीय सेमीकंडक्टर बाजारपेठ २०२० मध्ये १५ अब्ज डॉलर्स होती. २०२५ पर्यंत ती ६४ अब्ज डॉलर्स तर २०३० पर्यंत ११० अब्ज डॉलर्सपर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे. ती जागतिक मागणीच्या सुमारे दहा टक्के आहे. कौशल्य विकास तज्ज्ञांनी अहवालात म्हटले आहे की सेमीकंडक्टर उद्योगासाठी कोणालाही तयार करण्यासाठी विविध विषयांमध्ये मजबूत पाया आवश्यक आहे. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, विद्युत अभियांत्रिकी आणि संगणक विज्ञानाच्या मूलभूत गोष्टी समजून घेऊन, विद्यार्थी अर्धवाहक उपकरणे, उत्पादन प्रक्रिया, डिझाइन तंत्रे एक्सप्लोर करण्यासाठी तयार होऊ शकतो. नॅनोटेक्नॉलॉजी, मटेरियल सायन्स आणि सर्किट डिझाइन यांसारख्या विशिष्ट क्षेत्रातही हळूहळू पुढे जाऊ शकतो. या धोरण अहवालात, तज्ज्ञांनी शालेय स्तरावरूनच काही तांत्रिक अभ्यासक्रम सुरू करण्याचे सुचवले आहे. हे विविध मंत्रालयांशी संबंधित असल्याने, कौशल्य विकास मंत्रालय या सर्व मंत्रालयांच्या सहकार्याने या धोरणावर आणि रोडमॅपवर पुढे जाण्यासाठी पुढाकार घेत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या केंद्रस्थानी सेमीकंडक्टर आहेत आणि चिप्सची जागतिक मागणी गगनाला भिडत आहे; परंतु काही मर्यादित भौगोलिक क्षेत्रांमध्ये उद्योगाचे केंद्रीकरण झाल्यामुळे पुरवठा साखळी खूपच नाजूक आहे. भारत या संदर्भात एक प्रमुख खेळाडू म्हणून उदयास येत आहे. मेक इन इंडिया अंतर्गत इलेक्ट्रॉनिक्स सिस्टीम डिझाइन अँड मॅन्युफॅक्चरिंग , इंडिया सेमीकंडक्टर मिशन आणि सेमीकॉन इंडिया प्रोग्राम यांसारख्या प्रमुख क्षेत्रांपैकी एक म्हणून उपक्रमांनी उद्योगाला आधार देण्यासाठी एक परिसंस्था तयार करण्यास मदत केली आहे. नोएडा आणि बेंगळुरू येथे दोन अत्याधुनिक सेमीकंडक्टर डिझाइन सुविधा केंद्रांचे उद्घाटन झाले. ही भारतातील पहिली केंद्रे प्रगत ३ नॅनोमीटर चिप डिझाइनवर लक्ष केंद्रित करतात. देशाच्या सेमीकंडक्टर इनोव्हेशन प्रवासात हा महत्त्वाचा टप्पा ठरेल. मंत्रालयाच्या डिझाइन लिंक्ड इन्सेंटिव्ह योजनेअंतर्गत समर्थित स्टार्टअप्स आणि त्यांच्या चिप्स टू स्टार्टअप्स कार्यक्रमात लक्षणीय वाढ होत आहे. अलीकडेच स्मार्ट व्हिजन , सीसीटीव्ही कॅमेरे आणि इंटरनेट ऑफ थिंग्ज सारख्या अनुप्रयोगांसाठी चिप्स बनवणाऱ्या नेत्रासेमी या स्टार्टअप कंपनीला सरकारच्या चिप डिझाइन योजनेंतर्गत १०७ कोटी रुपयांची व्हेंचर कॅपिटल गुंतवणूक मिळाली. मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार २०२२ मध्ये डीएलआय योजना सुरू झाल्यापासून सरकारने २२ कंपन्यांना चिप डिझाइन प्रकल्पांसाठी २३४ कोटी रुपयांची मदत देण्याचे वचन दिले होते. त्याचा एकूण प्रकल्प खर्च ६९० कोटी रुपये आहे. एकत्रितपणे या स्टार्टअप्सनी व्हेंचर कॅपिटल गुंतवणूकदारांकडून ३८० कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी उभारला आहे.

याव्यतिरिक्त, पाच स्टार्टअप्सनी जागतिक चिप उत्पादकांसह त्यांचे चिप डिझाइन आधीच तयार केले असून त्यांची चाचणी केली आहे. केंद्र सरकारच्या म्हणण्यानुसार ७२हून अधिक कंपन्यांना चिप्स डिझाइन करण्यास मदत करण्यासाठी प्रगत सॉफ्टवेअर साधनांची उपलब्धता प्रदान करण्यात आली आहे.



# भगवान गणेशाला बाप्पा आणि मोरया का म्हंटले जाते

गणेश चतुर्थीचा सण भारतात खूप आनंदात साजरा केला जातो. या दिवसापासून गणेशोत्सवाची सुरुवात होते. लोक पूर्ण श्रद्धेने गणपती बाप्पाचं स्वागत करतात. त्यांची नियमित पूजा आणि आरती करतात. आपण नेहमी ₹गणपती बाप्पा मोरया₹ असा जयघोष करतो. असं करण्यामागे काही खास गोष्टी आहेत. गणपतीला बाप्पा आणि मोरया का म्हणतात हे आज आपण पौराणिक कथेतून सविस्तरपणे जाणून घेऊया.

यामागे आहे चिंचवड गावची एक गोष्ट

जवळपास ६०० वर्षांपूवीर्ची गोष्ट आहे. महाराष्ट्रातील चिंचवड गावात गणपतीचा एक भक्त होता. त्यांना मोरया गोसावी या नावाने ओळखले जायचे. मोरया गोसावी हे गणपती बाप्पाचे रूप होते असं मानलं जातं. त्यांचा जन्म १३७५ मध्ये झाला होता. त्यांचे वडील वामन भट्ट आणि आई पार्वती हे दोघेही गणपतीचे भक्त होते. गणपती बाप्पा त्यांच्या भक्तीने खुश झाले. त्यामुळे त्यांनी मोरया गोसावींच्या घरी जन्म घेण्याचा वरदान दिला अशी मान्यता आहे.

मोरयाच्या स्वप्नात गणपतीने सांगितलं...

मोरया गोसावी लहानपणापासूनच गणपतीच्या भक्तीत तल्लीन असायचे. गणेश चतुथीर्ला ते चिंचवडपासून ९५ किलोमीटर दूर असलेल्या मयूरेश्वर मंदिरात पायी दर्शनाला जायचे. गणपती बाप्पाचं वाहन मोर आहे. त्यामुळे त्यांना मयूरेश्वर म्हणतात. मोरया गोसावी यांनी सतत ११७ वर्षे मयूरेश्वर मंदिराला भेट दिली. जेव्हा ते खूप वृद्ध झाले तेव्हा त्यांना मयूरेश्वर मंदिरात जाणं कठीण झालं.

अशा स्थितीत एक दिवस गणपती बाप्पा त्यांना स्वप्नात दिसले आणि म्हणाले, 'आता तुला मंदिरात येण्याची गरज नाही. उद्या तू कुंडात स्नान करून बाहेर येशील तेव्हा तुला मी दिसेन.' दुसऱ्या दिवशी सकाळी मोरया गोसावींनी कुंडात स्नान केले. कुंडाबाहेर येताच त्यांना गणपतीची एक छोटी मूर्ती दिसली. ती मूर्ती अगदी स्वप्नात दिसल्यासारखीच होती.

चिंचवड आणि मयूरेश्वर मंदिराची मान्यता

मोरया गोसावींनी ती मूर्ती चिंचवडमध्ये मंदिरात स्थापित केली. हळूहळू ते ठिकाण लोकांमध्ये प्रसिद्ध झालं. त्यामुळे भक्त आणि देवामधील अंतर कमी झालं असं मानलं जातं. तेव्हापासून लोकांनी ₹गणपती बाप्पा मोरया₹ चा जयघोष करायला सुरुवात केली. चिंचवडमधील गणपतीची मूर्ती ही मयूरेश्वर गणपतीचा अंश आहे असं मानतात. त्यामुळे दरवर्षी त्या मूतीर्चा अंश मयूरेश्वर मंदिरामध्ये नेला जातो. त्यासाठी पालखी काढली जाते.

# अथर्वशीर्ष पठणाचे अनेक फायदे

लाडक्या बाप्पाच्या आगमनासाठी आता घरोघरी तयारी सुरू झाली आहे. श्री गणेशाला विघ्नहर्ता म्हंटले जाते. तर गणेश अथर्वशीर्ष हे पार्वती पूत्र गणेशाला समर्पित करण्यात आले आहे. अथर्वशीषार्चे पठण करणे आरोग्यासाठी लाभदायक मानले जाते. असे मानले जाते की दररोज गणपतीच्या अथर्वशीषार्चे पठण केल्याने जीवनातील नकारात्मक गोष्टी दूर होतात.

गणपती अथर्वशीषार्चे फायदे

गणपती अथर्वशीर्ष पठण केल्याने आयुष्यात सर्वांगीण प्रगती होण्यास मदत होते.

आयुष्यातील सर्व अडचणी दूर होतात.

याशिवाय करिअर आणि व्यवसायात प्रगती होण्यास फायदा होतो.

गणेश अथर्वशीर्ष पाठ केल्यास आर्थिक स्थिती सुधारते.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील अडथळे कमी होतात.

तुमच्या मनातील नकारात्मकता दूर होते.

मानसिक शांती लाभते आणि आत्मविश्वास वाढतो

मन स्थिर राहून अचूक निर्णय घेण्यास सक्षम होते.

या लोकांनी करावे अथर्वशीर्ष पाठ

काही लोकांना अथर्वशीर्ष पठण केल्याचे शुभ परिणाम दिसून येतात. ज्यांच्या कुंडलीत राहू, केतू आणि शनीचा अशुभ प्रभाव असतो त्यांच्यासाठी अथर्वशीर्ष पाठ फायदेशीर ठरते असे धर्मशास्त्रात म्हंटले आहे. याशिवाय विद्यार्थ्यांनी हा पाठ करावा. यामुळे अभ्यासात लक्ष केंद्रित करण्यासाठी मदत होते.

असा करा पाठ

दररोज स्नान केल्यानंतर गणपती अथर्वशीषार्चे पठण करावे.

देवघराजवळ आसनावर बसून शांत मनाने पठण करावे.

याशिवाय बुधवार, संकष्टी चतुर्थीच्या दिवशी 21 वेळा हा पाठ करण्याचे फायदे होतात.

# गणेश असा झाला गणपती...

श्री गणेश पुराण हे संपूर्ण श्री गणेश अवतार कार्य त्यांचा महिमा, मंत्र सिद्धी कार्य यावर आधारीत आहे. या उपपुराणाचे प्रामुख्याने दोन भाग आहेत. पहिला भाग उपासना खंड तर दुसरा भाग क्रिडा खंड या नावाने ओळखला जातो. या क्रिडा खंडात आपल्याला गणेश झाला गणपती ही कथा वाचायला मिळते. चला तर ही कथा वाचूया.

एकदा काय झाले. शंभोशंकर ध्यान करीत असताना बाल गणेश त्यांच्या दर्शनास आला. त्याने मोठ्या आदराने त्यांना वंदन केले. स्तुतिपाठ केला अन दर्शन घेत असताना गणेशाचे लक्ष शंकराच्या जटेतील चंद्रकोरीकडे गेले. त्याला ती चंद्रकोर आवडली. त्याने ती काढून घेतली अन तो सरळ ती घेऊन खेळायला निघून गेला. इकडे शंकराचे ध्यान संपले. ते देहभानावर येताच त्यांच्या असे लक्षात आले की हे काय? आपल्या माथ्यावरची चंद्रकोर कुठे गेली? त्यांनी शिवगणांकडे याबद्दल चौकशी केली. मी ध्यानात असता इथे कोणी आले होते का' म्हणून विचारले. त्यांनी गणेश दर्शनास आल्याचे सांगितले. तेव्हा शंकर यांनी मनोमन हाच विचार केला की, नक्कीच हे काम आपल्या खोडकर पुत्राचे असले पाहिजे. त्यांनी गणांना आज्ञा दिली, ह्यातातडीने जा आणि गणेशास शोधून त्याला माझ्याकडे आणा.ह्व त्याप्रमाणे नंदी, शैलाद्री यासारखे मुख्य अन् अन्य काही शिवगण हे गणेशाला शोधण्यासाठी निघाले.

शिवगण थोड्या अंतरावर गेले असता त्यांना गणेश दिसला. शिवगणांनी त्याला हाक मारली आणि पकडायला गेले तर गणेशाने त्यांना सहज गुंगारा दिला आणि तो दूर जाऊन बसला. शिवगण गणेशाकडे आले. त्यांनी शंकरांचा निरोपही दिला आणि सोबत चलण्याची विनंती केली. पण गणेश काही तयार होईना. शेवटी गणांनी विचार केला चला गणेशाला उचलून घेऊन जाऊ. म्हणून शिवगण त्याला उचलायला गेले तर तो इतका जड झाला की, काही केल्या त्यांना त्याला उचलता येईना. शिवगणांनी खूप प्रयत्न केला मग त्यांनी विचार केला शक्ती काम करेना तेव्हा युक्ती करून गणेशाला घेवून जावूया. त्यांनी गणेशाला मोदकाचे आमिष दाखवून आपले कार्य साधण्याचा प्रयत्न केला, पण ते काही जमेना.

शिवगणांची आज्ञा गणेश काही केल्या ऐकेना. उलट तोच सकल शिवगणांना म्हणाला, ₹हे पाहा, आज्ञा तुम्ही मला द्यायची नाही. तर मी दिलेली आज्ञा तुम्ही पाळायची. मीच तुम्हा सर्व गणांचा अधिपती आहे. मीच गणपती आहे. बोला आहे ना कबूल?₹ हो... हो... असे म्हणून शरणागत शिवगणांनी मान्यता दिली आणि त्यावेळेपासून गणांचा जो अधिपती, त्यांचा जो प्रमुख तो 'गणपती' हे नवे नाव गणेशास प्राप्त झाले.

# थायलंडमध्ये प्रति 'दगडूशेठ' गणपती मंदिर



पुण्यातील लोकप्रिय श्रीमंत दगडूशेठ हलवाईचा गणपती बाप्पा केवळ भारतातच नव्हे तर संपूर्ण जगभरात प्रसिद्ध आहे. याची प्रचिती आली आहे ती थायलंडमधील एका मंदिरावरून. म्हणजेच थायलंडमध्ये श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीचे प्रति मंदिर उभारण्यात आले आहे. थायलंडमधील फुकेत शहरात हे मंदिर आहे. विशेष म्हणजे तिथल्या प्रसिद्ध उद्योजिका पापसॉर्न मिपा या महिलेने हे मंदिर साकारले आहे. हुबेहूब पुण्याच्या दगडूशेठप्रमाणे असणारी 700 किलो वजनाची ही मूर्ती जहाजाने फुकेतमध्ये नेण्यात आली. ऑक्टोबर 2024 मध्ये या मंदिराचे उद्घाटन करण्यात आले.

लॉर्ड श्रीमंत गणपती बाप्पा देवालय असे या मंदिराचे नाव ठेवण्यात आले आहे. या मंदिरात बाप्पांची विधिवत स्थापना व पूजन करण्यात येते. तसेच उद्घाटन प्रसंगी पारंपरिक ढोल- ताशा पथकांच्या सादरीकरणाने मिरवणूक देखील काढण्यात आली. हे मंदिर दर्शनासाठी खुले झाल्यापासून दररोज 500 हून अधिक भाविक इथे येतात. 50 फूट उंच मंदिर पर्यटकांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरत आहे. जवळपास 20 महिने या मंदिराचे बांधकाम सुरू होते. या मंदिरात मुख्य गणपतीच्या मुर्तीसह, पंचधातूची छोटी मूर्ती, शिवलिंग, भगवान शंकर आणि पार्वती यांच्या मूर्ती पुण्याहून थायलंडला समुद्रमार्गे जहाजेतून नेण्यात आल्या. या सर्व गोष्टी पुण्याहून थायलंडला नेण्यासाठी तब्बल 30 दिवसांचा कालावधी लागला. तसेच या मंदिराच्या निमार्णासाठी तब्बल नऊ ते दहा कोटी रुपये खर्च आला. हे पुण्यातील दगडूशेठ मंदिराचे हे प्रति मंदिर केवळ पुणेकर नव्हे तर संपूर्ण जगभरातील भारतीयांसाठी अभिमानाची बाब आहे.

कोण आहेत मिस मिपा?

मिस मिपा या फुकेत शहरातील मोठ्या बांधकाम व्यावसायिक आहेत. त्या फुकेत नाइन रिअल इस्टेट कंपनीच्या चेअरमन आहेत. त्या गेल्या वीस वर्षांपासून दर महिन्याला पुण्यात येऊन बाप्पांचे दर्शन घेऊन जातात. दगडूशेठ गणपती मंदिराची प्रतिकृती थायलंडमध्ये साकारून त्यामध्ये दगडूशेठ गणपतीची स्थापना करावी, असा त्यांचा मानस होता. त्यांनी पुण्यातील मंदिराच्या सर्व प्रथा, परंपरा आणि धार्मिक शिस्त जाणून घेतली आणि ती थायलँडमध्येही पाळली जाते. पूजा, आरती, नैवेद्य हे सर्व नित्यनियमाने या मंदिरात होत असते. शिवाय पुणे शहरातून तीन पुजारी आणि दोन सेवक असे पाच जण कायमस्वरूपी मंदिरात सेवेत आहेत.

# अष्टविनायका तुझा महिमा कसा..! जाणून घ्या काय आहेत कथा




1. श्रीमोरेश्वर , मोरगाव :

अष्टविनायकापैकी मोरेश्वर गणपती हा पहिला गणपती आहे. हे मंदिर पुणे जिल्ह्यातील बारामती तालुक्यात आहे. हे मंदिर गणेश भक्त मोरया गोसावी यांनी बांधलं आहे. श्रीगणेशाने मोरावर बसून सिंदुरा राक्षसाचा वध केला. म्हणून या गणपतीला मोरेश्वर असं म्हणतात. मूर्तीच्या डोळ्यात आणि बेंबीमध्ये हिरे आहेत. मूर्तीच्या डाव्या आणि उजव्या बाजूला रिद्धी सिद्धीच्या पितळेच्या मुर्त्या आहेत. मंदिराच्या चार दिशेला चार दरवाजे आहेत आणि चारही दरवाजांवरती गणेशाच्या मुर्त्या आहेत, हे चार दरवाजे असे दर्शवतात की चारही युगात श्री गणेश आहेत.

2. श्रीचिंतामणी, थेऊर :

अष्टविनायकापैकी दुसरा गणपती म्हणजे थेऊरचा चिंतामणी. या गणपतीबाबत एक कथा सांगितली जाते की, गुणासूर नावाचा एक राक्षस होता, त्याने एक दिवस कपिलमुनींकडून चिंतामणी हिरा चोरला. हे कपिलमुनींना कळल्यावर त्यांनी गणपतीला तो हिरा परत आणायला सांगितले. गणपतीने गुणासुराचा वध केला आणि कपिलमुनींची चिंता मिटवली म्हणून या गणपतीला चिंतामणी म्हटले जाते. थेऊरच्या मंदिरातील मूर्ती स्वयंभू आहे. गणेशाची मूर्ती पूर्वाभिमुख आणि डाव्या सोंडेची आहे. श्री गणेशाच्या दोन्ही डोळ्यात हिरे आणि लाल मणी आहेत.

3. श्रीसिद्धीविनायक, सिद्धटेक :

सिद्धीविनायक हा अष्टविनायकापैकी तिसरा गणपती. अष्टविनायकांपैकी हा एकमेव उजव्या सोंडेचा गणपती आहे. सिद्धिविनायक गणपती हे अहमदनगर जिल्ह्यात सिद्धटेक येथे आहे. पूर्वी इथे मंदिराकडे पोहोचण्यासाठी होडीने नदी पार करावी लागत असे, पण आता पूल बांधल्याने तेथे पायी किंवा गाडीने जाता येते. या गणपतीबाबतची कथा म्हणजे, मधु आणि कैटभ नावाचे दोन दानव होते. ते ब्राम्हणांना त्रास देत होते. त्यांच्याबरोबर विष्णूने लढाई केली पण त्याला दानवांचा पराभव करता येईना. म्हणून विष्णू शंकराजवळ गेले तेव्हा शंकराने सांगितल की तुम्ही लढाई सुरू करण्यापूर्वी गणेशाची पूजा केली नाही. तेव्हा सिद्धटेक येथे विष्णूने तपश्चर्या केली आणि गणेशाला प्रसन्न केलं. याठिकाणी गणपतीने विष्णूला शक्ती म्हणजेच सिद्धी प्राप्त करून दिली म्हणून गणपतीला सिद्धीविनायक म्हटले जाते.

4. श्रीमहागणपती,रांजणगाव :

श्री महागणपती रांजणगाव पुणे जिल्ह्यात आहे. महागणपती रांजणगावचे मंदिर पूर्वाभिमुख आहे. या मंदिरा संदर्भ एक कथा आहे, ती अशी आहे की, त्रिपुरासूर नावाचा एक राक्षस होता. त्याला एक वरदान मिळाले होते की त्याला शंकराशिवाय कोणीच मारू शकत नाही, म्हणून त्याने सर्वत्र थैमान घातले होते. सर्व देवांना तो त्रास देत होता. तेव्हा शंकराने गणपतीचे स्मरण करून त्याच्या साथीने या त्रिपुरासुराचा नाश केला. ते ठिकाण होते रांजणगाव. या मंदिरातील मूर्ती तळघरात आहे. मंदिराची रचना अशी केली आहे की सूयार्ची किरणे थेट मूर्तीवर पडतात.

5. श्रीविघ्नेश्वर, ओझर :

श्रीविघ्नेश्वर गणपती हा अष्टविनायकापैकी पाचवा गणपती आहे. या मंदिरामागची कथा अशी की, अभिनंदन नावाचा एक राजा होता. त्याला त्रिलोकाधीश व्हायचं होतं. त्यासाठी त्याने यज्ञ सुरू केला. हे पाहून इंद्राला भीती वाटली म्हणून इंद्राने विघ्नासूर नावाचा राक्षस उत्पन्न केला. आणि त्याला यज्ञात अडथळा आणण्यास सांगितले. विघ्नासराने यज्ञात अडथळा आणलाच पण दुसऱ्या सर्व यज्ञातही त्याने अडथळे आणले. हे पाहून ऋषिमुनींनी श्रीगणपतीची आराधना केली. गणपतीने विघ्नासुरासोबत लढाई केली व त्याला पराभूत केले. म्हणून त्याला विघ्नेश्वर नाव पडले. या गणपती मंदिराचा गाभारा दहा बाय दहा फुटाचा आहे. मंदिरातील मूर्ती पूर्वाभिमुख आहे. श्रींच्या मूर्तीच्या कपाळावर आणि नाभीवर हिरे जडले आहेत.

6. श्रीगिरिजात्मज, लेण्याद्री :

सहावा गणपती म्हणजे गिरिजात्मज. पुण्यातील जुन्नर तालुक्यात हे मंदिर आहे. या मंदिराबाबतची एक कथा म्हणजे पार्वती मातेने इथे श्रीगणेशाची पार्थिव मूर्ती बनवली होती. पार्वतीला गिरिजा म्हटलं जातं. तिचा मुलगा म्हणजे आत्मज होय. गिरिजात्मज म्हणजेच पार्वतीचा मुलगा. म्हणून त्याला हे नाव पडलं असावं असं म्हटलं जातं. गणपतीची मूर्ती दक्षिणाभिमुख आहे. अजून एक वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये सूर्योदयापासून ते सूर्यास्तापर्यंत मंदिरातील मूर्तीवर उजेड पडत असतो.

7. श्रीवरदविनायक , महाड :

वरदविनायक गणपतीबाबतीत एक कथा सांगितली जाते. गृत्समद नावाचा ऋषी होता. त्याने गणपतीची म्हणजेच विनायकाची आराधना केली. श्रीविनायक त्याला प्रसन्न झाले आणि त्याच्याकडून वर मागितला. तेव्हा गृत्समदाने विनायकाकडे मागणी केली की, ह्लतुम्ही या वनात वास्तव्य करा आणि सर्व भक्तांच्या इच्छा पूर्ण कराह्व ते मान्य करुन विनायक तेथेच राहू लागले. ते भद्रक वन म्हणजे आताचे महाड होय. या ठिकाणी गृत्समदा ला श्री गणेशाने वर दिले म्हणून येथे विनायकाला ह्लवरदविनायकह्व असे म्हणतात.

8. श्रीबल्लाळेश्वर मंदिर , पाली :

हे मंदिर अष्टविनायकापैकी आठवे मंदिर. रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यात हे मंदिर आहे. कल्याण नावाचा एक व्यापारी होता त्याचा एक मुलगा होता त्याचं नाव होतं ह्लबल्लाळह्व. बल्लाळ गणपतीचा खूप मोठा भक्त होता, तो भक्तीमध्ये एवढा वेडा होता की त्याने आपल्या मित्रांनाही गणेश भक्ती चे वेळ लावले होते. ते सर्व जवळच्या जंगलात जाऊन गणपतीची पूजा करत असत. हे बघून त्याच्या मित्रांचे घरातील लोक अस्वस्थ झाले होते आणि त्यांनी बल्लाळ च्या वडिलांकडे तक्रार केली. कल्याण शेठ रागाच्या भरात जंगलात गेले, हातात चाबूक घेतला होता, ते बघून सर्व मित्र पळून गेले,, बल्लाळ एकटा भक्ती मध्ये लिन झाला होता. कल्याण शेठ ने बल्लाळ खूप मारले व एका झाडाला बांधून तेथेच त्याला सोडून आले. आणि निघताना त्याला बोलून आले की आता बोलाव तुज्या गणेशाला तुला सोडवण्यासाठी. तेव्हा गणपती तेथे ब्राम्हणाच्या रुपात आला आणि त्याने बल्लाळला सोडवलं. तेव्हापासून तिथे गणपती बल्लाळेश्वर म्हणून वास्तव्य करू लागला असं म्हटलं जातं.

# गणपतीच्या पूजेत या गोष्टी चुकूनही वापरू नका अन्यथा होईल अनर्थ बाप्पा होतील क्रोधीत...!

कोणतेही शुभकार्य प्रारंभ करताना भगवान गणेशाची पूजा केली जाते. आपले कार्य निर्विघ्नपणे पार पाडण्यासाठी गणपतीला प्रार्थना केली जाते. भगवान गणेश प्रथम पुजनीय असल्याने व संकटांचा नाश करणारे देवता असल्याने शुभ कार्यात त्यांची प्रथम पूजा केली जाते. मात्र भगवान गणेशाला काही गोष्टी अप्रिय असल्याने त्यांच्या पूजेत त्या गोष्टी शास्त्रानुसार निषिद्ध मानल्या जातात. या गोष्टी जर तुम्ही चुकूनही गणेश पूजेत वापरल्या तर भगवान गणेश रागावू शकतात ते क्रोधीत होऊ शकतात. त्यामुळे धार्मिक शास्त्रानुसार गणेशपूजनात या गोष्टी निषिद्ध असल्याने त्यांचा वापर टाळावा. पाहुयात कोणत्या आहेत या गोष्टी.



१. तुळस : भगवान गणेशाच्या पूजेत तुळस कधीच वापरली जात नाही. भगवान गणेशाला नेहमी दुर्वा अर्पण केल्या जातात. यामागे एक पौराणिक कथा आहे. कथेनुसार भगवान गणेशाला तुळशीने विवाहप्रस्ताव दिला होता असे सांगितले जाते. मात्र गणेशाने तो प्रस्ताव स्वीकारला नाही अशी कथा आहे. याच कारणास्तव गणपतीला तुळस अर्पण केली जात नाही.

२. केतकीचे फुल : गणपती बाप्पाला केतकीचे फुल अजिबात अर्पण केले जात नाही. कारण या फुलाला भगवान शंकराने श्राप दिला होता अशी कथा आहे. याच कारणाने गणपती बाप्पाला देखील हे फुल अप्रिय असल्याचे शास्त्रात सांगितले जाते. त्यामुळे गणेशाला जास्वदांचे फुल प्रिय असल्याने ते वाहिले जाते. म्हणून तुम्ही गणेशपूजेत चुकूनही केतकीचे फुल वाहू नका.

३. दुभंगलेले तांदूळ : गणपती पूजेत अक्षतांना महत्व आहे. अक्षता म्हणजेच तांदूळ. मात्र गणेश पूजेत जेव्हा आपण तांदूळ वापरतो तेव्हा ते तुटलेले नसावेत. तांदूळ हे नेहमी अखंड असावेत. यामुळे घरात भरभराट येते असे मानतात. मात्र तुम्ही जर गणेशपूजेत तुटलेले तांदूळ वापरले तर तुमच्या मागे दारिद्र्य लागू शकते असे सांगितले जाते. त्यामुळे लक्षात ठेवा गणेशपूजेत नेहमी अखंड तांदूळ वापरावे.

४. पांढऱ्या वस्तू : भगवान गणेशाची चंद्रदेवाने एके दिवशी चेष्ठा केली होती असा पौराणिक कथेत उल्लेख आहे. यामुळे गणेशाने चंद्राला श्राप देखील दिला होता. त्यामुळेच चंद्राला प्रिय असलेला पंधरा रंग किंवा त्या रंगाच्या वस्तू गणेशपूजेत वापरू नये असे शास्त्रात सांगितले आहे. बाप्पाला दुधाचा नैवेद्य दाखवणे टाळावे तसेच पांढऱ्या मिठाई प्रसादात ठेवू नये, पांढरी फुले वाहणे टाळावे. बाप्पाला लाडू मोदक यांचा प्रसाद दाखवला जातो तसेच लाल रंगाची किंवा झेंडूची फुले वाहिल्याने बाप्पा प्रसन्न होतात असे म्हंटले जाते.

# शनी साडेसाती, ग्रहांच्या शांतीसाठी गणपतीकडे करा प्रार्थना, ग्रहदोष होतील दूर, मिळेल अपार सुख समृद्धी...!

गणपती बाप्पा भक्तगणांचे विघ्न दूर करतात आणि कार्य पूर्ण करतात असे मानले जाते. जिथे गणेशजींची पूजा होते तिथे ऋद्धी-सिद्धी वास करतात अशी देखील मान्यता आहे. विघ्नराजाच्या आशीवार्दाने शुभ लाभ मिळतो. कारण ऋद्धी आणि सिद्धी त्यांच्या पत्नी आहेत. शुभ आणि लाभ त्यांचे पुत्र आहेत. 'श्री गणेश अथवा श्री गणेशाय नमः' हा मंत्र बोलून कोणत्याही शुभ कायार्ची सुरुवात करतात. त्यामुळे काम निर्विघ्न पार पडते. सनातन धर्मात कोणतेही शुभ काम करण्यापूर्वी गणेशजींची आराधना करतात. कार्यामध्ये कोणताही अडथळा येऊ नये हा त्यामागचा उद्देश असतो. जसा मंत्राच्या सुरुवातीला ओंकार महत्त्वाचा आहे तसेच प्रत्येक शुभ प्रसंगी गणेशजींची पूजा आवश्यक आहे. धर्मशास्त्रात गणेशजींना विघ्नहर्ता म्हटले आहे.

गणपतीच्या प्रथम पूजेबद्दल अनेक कथा आहेत. भगवान शंकरांनी गणपतीचे मस्तक छाटले, तेव्हा पार्वती माता खूप रागावली. हत्तीचे डोके लावल्यानंतरही त्या शिवजींवर नाराज होत्या. तेव्हा भगवान शंकरांनी त्यांना वचन दिले की त्यांचा पुत्र गणेश कुरूप नाही म्हणवला जाणार. त्याची पूजा सर्व देवांपेक्षा आधी केली जाईल. तसेच गणपती हे एक महान लेखक आणि ज्योतिषी आहेत. तसेच गणेशाच्या भक्तीने सर्व ग्रहदोष देखील दूर होतात. गणपतीला प्रार्थना करून शनीची साडेसाती देखील नाहीशी होऊ शकते कारण गणपतीला विघ्नहर्ता म्हंटले जाते.

महाभारताच्या लेखनात गणपतीने वेद व्यासजींना मदत केली. स्कंद पुराणातील माहितीनुसार शिवजींच्या सांगण्यावरून गणपती काशी नगरीतील प्रत्येक घरात जाऊन भविष्य सांगतात. त्यामुळे ज्योतिषशास्त्राच्या प्रत्येक कामात त्यांचे स्मरण आवश्यक आहे. ऋग्वेदामध्येही म्हटले आहे, 'न ऋते त्वम् क्रियते किं चनारे'. याचा अर्थ, हे गणेश! तुज्याशिवाय कोणतेही कार्य सुरू होत नाही. म्हणून, गणेशजींचे स्मरण करून, त्यांची स्तुती करून, त्यांचा आशीर्वाद घेऊन, सर्व अडचणी दूर करून आयुष्यात पुढे जायला हवे. यामुळे जीवनातील सर्व दुःख पीडा,ग्रहदोष दूर होतात अशी मान्यता आहे.

# लालबागचा राजा मंडळाला अन्नछत्रासाठी परवानगी नाकारली

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक



लालबागचा राजा मंडळाने यंदापासून दर्शनाला येणाऱ्या सर्व भक्तांना जेवण देण्याचे ठरवले होते. मात्र मुंबई महापालिकेने या अन्नछत्रासाठी परवानगी नाकारल्यामुळे यंदा मंडळाचा हा उपक्रम होऊ शकणार नाही. पेरू कंपाऊंड येथे अन्नछत्रासाठी उभारलेल्या मंडपाला मुंबई महापालिकेने नोटीस बजावली आहे. त्यामुळे गणेशोत्सवाच्या पहिल्याच दिवशी हा उपक्रम बंद करावा लागला. लालबागचा राजा मंडळाच्या गणपतीचे दर्शन घेणाऱ्या भाविकांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून या भक्तांच्या सोयीसाठी यंदा मंडळाने जेवणाची व्यवस्था करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र पहिल्याच वर्षी या उपक्रमाला परवानगी मिळू शकली नाही. लालबागचा राजा मंडळाला गणेशोत्सवाच्या काळात सुमारे लाखो भाविक भेट देतात. त्यापैकी नवसाच्या रांगेत तासनतास उभे राहणाऱ्या भाविकांसाठी मंडळातर्फे खाद्य पदार्थ दिले जातात. यंदा सर्वच भाविकांना प्रसाद म्हणून जेवण देण्याचा निर्णय लालबागचा राजा मंडळाने घेतला होता. त्याकरीता पेरु कंपाऊंड येथील मोकळ्या जागेत भव्य मंडप उभ्यारण्यात आला होता. मात्र भक्तांची सुरक्षा लक्षात घेता मुंबई पोलिसांनी व अग्निशमन दलाने या अन्नछत्राला परवानगी देण्यास नकार दिला होता. तेथे चेंगराचेंगरी सदृश परिस्थिती निर्माण होऊ शकते. या कारणास्तव अन्नछत्राला परवानगी देण्यास अग्निशमन दलाचा व पोलिसांचा नकार होता. मात्र मंडप उभारलेला असल्यामुळे मुंबई महापालिकेच्या एफ दक्षिण विभागाने पेरु कंपाऊंड येथील जागेच्या मालकाला नोटीस बजावली होती. २४ तासात अन्नछत्र काढावे अन्यथा कारवाई करून काढण्यात येईल असा इशारा या नोटीशीतून देण्यात आला आहे. पेरु कंपाऊंडची ही जागा सध्या एका विकासकाच्या ताब्यात आहे. त्यामुळे मुंबई महापालिकेच्या विभाग कार्यालयाने या विकासकाला नोटीस बजावली आहे. मुंबई महानगरपालिका कायदा, १८८८ मधील कलम ३५१(१) नुसार ही नोटीस बजावण्यात आली आहे. त्यात जागेवरील तात्पुरते बांधकाम, साहित्य, यंत्रसामुग्री, साधने, उपकरणे, मालमत्ता काढून टाकण्याबाबत ही नोटीस आहे. दरम्यान, लालबागच्या राजा मंडळाने या अन्नछत्रासाठी मोठे नियोजन केले होते.

# पप्पाने मम्मीचे हात-पाय बांधले, रॉकेल ओतलं अन् लायटरने..




■नवी मुंबई। प्रतिनिधी:

एका व्यक्तीने विवाहबाह्य संबंधाच्या संशयावरून आपल्या 32 वर्षीय पत्नीला जाळून मारल्याचा आरोप आहे. त्यानंतर त्याने या प्रकाराला पत्नीने स्वतःचा जीव घेतला असं दाखवण्याचा प्रयत्नही केला. मात्र, त्याच्या सात वर्षांच्या मुलीने पोलिसांना सारं स्पष्टपणे सांगितले. तिच्या वडिलांनी तिच्या आईला जाळलं, असं या चिमुकलीने सांगितलं. तेव्हा त्याचा खोटारडेपणा उघड झाला.

आरोपी पतीला अटक

25 ऑगस्ट रोजी पहाटे उरण परिसरातील पागोटेगाव येथे ही घटना घडल्याची माहिती आहे. याप्रकरणी 35 वर्षीय आरोपीला दुसऱ्याच दिवशी अटक करण्यात आली आहे. उरण पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक हनीफ मुलानी यांनी पीटीआयला सांगितले की, आरोपी राजकुमार रामशिरोमणी साहू याला त्याची पत्नी जगराणी राजकुमार साहू यांचे विवाहबाह्य संबंध असल्याचा संशय होता. त्याने पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार, त्याने पीडितेचे हातपाय बांधले, तिच्यावर रॉकेल ओतले आणि लाईटरने तिला जाळून टाकले. महिलेला जखमी अवस्थेत रुग्णालयात नेण्यात आले, जिथे डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. आरोपीने दावा केला होता की त्याच्या पत्नीने स्वतःला घराच्या एका खोलीत कोंडून घेतले आणि आपल्या आयुष्याची अखेर केली, त्यानंतर सुरुवातीला अपघाती मृत्यूचा गुन्हा दाखल करण्यात आला. पण तपासात त्याच्या जबाबात तफावत आढळून आल्याचं पोलिसांनी सांगितलं.

पोस्टमार्टम रिपोर्ट आणि जोडप्याच्या सात वर्षांच्या मुलीच्या महत्त्वपूर्ण जबाबानंतर या प्रकरणाचं संपूर्ण सत्य समोर आलं. आरोपीने दावा केला होता की त्याच्या पत्नीने स्वतःला खोलीत कोंडून घेतले आणि जीव दिला. परंतु मुलाचे जबाब पतीच्या जबाबाशी जुळत नव्हते, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज देखील तपासले आणि त्यात घटनेनंतर काही तासांत आरोपी घराबाहेर पडताना दिसून आला. हा एक महत्त्वाचा पुरावा होता जो घटनेवेळी घरी उपस्थित नव्हता या पुरूषाच्या दाव्याच्या विरोधात जात होता, असंही अधिकाऱ्यांनी सांगितले. पतीला अटक करण्यात आली असून हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# लग्नात 15 लाख रोकड अन् 15 तोळे सोनं हुंडा, तरी सासरी छळ; 27 वर्षीय गर्भवती इंजिनिअरने आयुष्य संपवलं

■बंगळुरू। प्रतिनिधी:

27 वर्षीय विवाहित इंजिनिअर महिलेने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना कर्नाटकातून समोर आली आहे. राहत्या घरात गळफास घेऊन तिने आयुष्याची अखेर केली. सासरी सततच्या हुंड्याच्या मागणीला कंटाळून तिने मृत्यूला कवटाळल्याचा आरोप केला जात आहे. मयत महिलेचे नाव शिल्पा असून तिचा पती प्रवीण याला आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपावरून अटक करण्यात आली आहे. हुंड्यासाठी सतत होणा□या छळामुळे शिल्पाने आत्महत्या केल्याचा आरोप तिच्या कुटुंबीयांनी केला आहे. लग्नाआधी 15 लाख रुपये, 15 तोळे सोने आणि घरातील वस्तूंची मागणी करण्यात आली होती, असेही त्यांनी सांगितले. शिल्पा पूर्वी इन्फोसिस कंपनीमध्ये काम करत होती. शिल्पा आणि प्रवीण यांचा विवाह होऊन सुमारे अडीच वर्षे झाली होती. या जोडप्याला दीड वर्षाचे बाळ आहे आणि शिल्पा पुन्हा गर्भवती होती, असे तिच्या कुटुंबीयांनी सांगितले.



शिल्पाच्या पालकांनी तक्रारीत म्हटले आहे की, प्रवीणच्या कुटुंबीयांनी लग्नापूर्वी 15 लाख रुपये रोख, 15 तोळे सोन्याचे दागिन्यांची मागणी केली होती. या मागण्या पूर्ण करूनही, लग्नानंतर शिल्पावर अधिक पैसे आणि मौल्यवान वस्तूसाठी वारंवार दबाव टाकला जात होता.

तिचे काका चेन्नबसय्या यांनी सांगितले की, आम्ही तिचे तीन वर्षांपूर्वी मोठ्या थाटामाटात तिचं लग्न केलं. आम्ही आमचे घर विकून लग्नात 40 लाख रुपये खर्च केले. त्यावेळी आम्ही तिला सोन्याचे दागिनेही दिले. त्यांच्या म्हणण्यानुसार, लग्नानंतरही मागणी सुरूच होती. काही महिन्यांपूर्वी त्यानी आमच्याकडून आणखी दहा लाख रुपये घेतले होते. त्यांना आता दीड वर्षांचे बाळ आहे आणि ती पुन्हा गर्भवती आहे. लग्नाच्या वेळी तो बी.ई., एम.टेक पदवीधर असल्याचे सांगत होता. पण गेल्या दोन वर्षांपासून तो पाणीपुरी विकत आहे₹ असाही आरोप चेन्नबसय्या यांनी केला. चेन्नबसय्या यांनी शिल्पाच्या मृत्यूच्या परिस्थितीविषयी शंका व्यक्त केली. ₹घरामध्ये पंख्याखाली कोणतीही खुर्ची किंवा कोणतीही वस्तू ठेवलेली नव्हती. पंखा देखील अशा उंचीवर नव्हता, की तिथे कोणालाही सहज पोहोचता येईल. दरवाजा तोडल्याचे कोणतेही चिन्ह दिसत नव्हते₹ असे ते म्हणाले. पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# बुलेट दुचाकींचा आवाज अन् DJ मुक्तीसाठी आयुष्यभर काम, सामाजिक कार्यकर्ता महिलेनं संपवलं जीवन



■ठाणे। प्रतिनिधी:

जल प्रदूषण, ध्वनी प्रदूषण तसेच विविध सामाजिक समस्याविरोधात प्रखर लढा देणाऱ्या हिराली फाउंडेशनच्या प्रमुख सरिता खानचंदानी यांनी आज गुरुवारी दुपारी एका सात मजली इमारतीवरून उडी मारत आत्महत्या केल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. जखमी सरिता यांना रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असता उपचारा दरम्यान त्यांचा मृत्यू झाला आहे. या घटनेने उल्हासनगर शहरात एकच खळबळ उडाली आहे. उल्हासनगर शहरात एकीकडे धुमधडाक्यात गणेशोत्सव साजरा केला जात असतांना शहरात बुधवारी रात्री गोळीबाराच्या घटनेत दोघे जखमी झाले. तोच गुरुवारी दुपारी कॅम्प 4 परिसरातील विठ्ठलवाडी पोलिस स्टेशनसमोर असलेल्या रोमा अपार्टमेंट परिसरात खळबळ उडाली. सरिता या काल गुरुवारी दुपारी आपल्या कार्यालयातून निघून थेट कार्यालयासमोरील रोमा अपार्टमेंट या सात मजल्याच्या इमारतीच्या सातव्या मजल्यावर चढल्या, त्यानंतर इमारतीच्या टेरिसवर बसून दोन्ही हात झोडून प्रार्थना करत सरिता यांनी थेट खाली उडी मारली. या थरारक घटनेचा व्हिडीओ दुसऱ्या इमारतील काही नागरिकांनी काढला. या घटनेत गंभीर जखमी झालेल्या सरिता यांना तात्काळ जवळच्या बालाजी रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर त्यांना कॅम्प 3 येथील मॅक्सिलाइफ रुग्णालयात हलविण्यात आलं. मात्र प्रकृती चिंताजनक असल्यामुळे पुढील उपचारासाठी त्यांना डोंबिवली येथील एम्स रुग्णालयात हलवण्यात आलं होतं.

# पिंपरी-चिंचवडमध्ये मास्क मॅनची दहशत!

■मुंबई। प्रतिनिधी:

पुण्यातील गुन्ह्यांचे आणि पर्यायाने दहशतीचे वातावरण वाढतच असून विद्येचे माहेरघर असलेले हे शहर आता एक नवी, क्रूर ओळखं मिळवतंय की काय अशा घटना एकापाठोपाठ एक घडतच आहेत. कधी स्वारगेट बस अत्याचार, तर कधी ड्रिंक अँड ड्राईव्ह करत निष्पापांना उडवणं असो किंवा तरूणांची नशेत अश्लील कृत्य असोत. पुण्याचं नाव दिवसेंदिवस बदनाम होत चाललंय. हेच कमी की काय म्हणू भरदिवसा हल्ले, मारमारी, खूनही होत आहेतच. नुकताच पिंपरी चिंचवडमध्ये एका मास्क मॅनची दहशत पाहायला मिळाली. पिंपरी चिंचवडमध्ये एका मास्क मॅनची दहशत पाहायला मिळाली. हा मास्क मॅन दिवसाउजेडी पिंपरी चिंचवड येथे हातात चाकू घेऊन फिरताना दिसला. शहरातील लोकांमध्ये



दहशत निर्माण करण्यासाठी या मास्क मॅनने धारधार चाकू हातात घेतला आहे. पिंपरी चिंचवड शहरात मास्क मॅन ची दहशत पाहायला मिळत आहे. भर रस्त्यात , भर दिवसा हातात धारदार चाकू घेऊन मास्क मॅन शहरात वावरताना पाहायला मिळत आहे. निगडी येथील बजाज ऑटोमोबाईल समोरील एचपी पेट्रोल पंपाजवळ काही वेळापूर्वी मास्क मॅन हातात धारदार चाकू घेऊन रस्ता क्रॉस करत असताना दिसत आहे. त्याने कोणाला मारण्यासाठी हा चाकू हातात घेतला आहे की लोकांना दहशत निर्माण करण्यासाठी हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.

# जालन्यात भरधाव कार विहिरीत कोसळली

■मुंबई। प्रतिनिधी:

महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून सातत्याने अपघातांची मालिका सुरु आहे. त्यातच आता मराठवाड्यातील जाफराबाद तालुक्यात एक भीषण अपघात झाला आहे. या अपघातात पाच जणांचा दुदैवी मृत्यू झाला आहे. जाफराबाद-राजूर रस्त्यावर असलेल्या गाडेगव्हाण फाट्याजवळ एक कार विहिरीत कोसळली. या दुर्घटनेत पाच जणांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे जालना जिल्ह्याला हादरा बसला असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जालनाच्या जाफराबाद-राजूर रस्त्यावरील गाडेगव्हाण फाट्याजवळ एक कार विहिरीत कोसळली. भोकरदन तालुक्यातील कोपरडा गावातून हे सर्व जण छत्रपती संभाजीनगर येथील सुलतानपूरकडे निघाले होते. यावेळी एका रुग्णाला




उपचारासाठी घेऊन जात असताना पहाटे ५ ते ६ च्या सुमारास चालकाचे नियंत्रण सुटले. भरधाव वेगाने येणाऱ्या कारने रस्त्यालगत मॉर्निंग वॉक करणाऱ्या एका व्यक्तीला धडक दिली.

त्यानंतर ती कार थेट विहिरीचा कठडा तोडून सुमारे 70 फूट खोल विहिरीत कोसळली. या विहिरीमध्ये सुमारे 60 फूट पाणी होते. त्यामुळे कारमधील पाचही जणांचा बुडून मृत्यू झाला. या अपघाताची माहिती मिळताच टेंभुर्णी पोलीस, भोकरदन अग्निशमन दल आणि स्थानिक ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. या ठिकाणी युद्धपातळीवर बचावकार्य सुरु करण्यात आले. विहिरीतील पाणी उपसल्यानंतर पाच जणांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले. या अपघातात मृत्यू झालेले सर्व जण एकमेकांचे नातेवाईक होते.

दरम्यान या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे. सध्या सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. आता पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. दरम्यान नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यात असलेल्या सर्वतीर्थ टाकेद येथे रविवारी सकाळी एक भीषण अपघात झाला. ऋषिपंचमीच्या निमित्ताने मालेगावमधून दर्शन आणि स्नानासाठी आलेल्या दहा ते बारा महिला या अपघातात गंभीर जखमी झाल्या. त्या महिला एका पिकअप वाहनातून प्रवास करत होत्या. मात्र, रस्त्यावर झालेल्या चिखलामुळे आणि सततच्या पावसामुळे रस्ता निसरडा झाला होता. यामुळे चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि हा अपघात झाला. अपघातानंतर पिकअप गाडी रस्त्याच्या खाली घसरली आणि पलटी झाली, ज्यामुळे महिलांना दुखापत झाली. हा अपघात घडताच स्थानिक नागरिक आणि इतर भाविकांनी तात्काळ मदतकार्य सुरू केले. जखमी महिलांना तातडीने सर्वतीर्थ टाकेद येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले आहे. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे.

# बसमध्ये बसलेली बायको ढसाढसा रडली, एक उचकी आणि संपलं आयुष्य



■अमरावती। प्रतिनिधी:

बाकोला एक उचकी आणि बसमध्येच तिचं आयुष्य संपलं... अशात त्या महिलेसोबत काय झालं असेल असा प्रश्न तुम्हाला देखील पडला असेल. महिलेला एक फोन आला आणि महिलेच्या कानावर पडलेल्या त्या तीन शब्दांमुळे महिलंचं निधन झालं... संबंधित घटना दिल्ली येथील हरदोई येथे घडली आहे. एका महिलेचं चालत्या बसमध्ये निधन झालं. महिलेला एक फोन आला आणि फोनवर जे काही संभाषण झालं ते ऐकल्यानंतर तिचं निधन झालं. फोनवर बोलणं झाल्यानंतर महिला ढसाढसा रडु लागली. अशात तिच्या आईने काय झालं विचारलं. तेव्हा महिला म्हणाली, नवऱ्याच्या फोनवरून एक महिलेने फोन केला आणि मला म्हणाली तुझी सवत बोलतेय... हे तीन शब्द ऐकताच महिलेला उचकी आणि तिचा मृत्यू झाला. मृत्यू झालेल्या मुलीचं नाव रिता असं होतं. मिळालेल्या माहितीनुसार, पोलिसांनी महिलाचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला आहे.

महिलेची आई गुड्डी यांनी दिलेल्या माहितीनुसार, दीड वर्षांपूर्वी आम्ही आमच्या मुलीचं लग्न सीतापूर येथील मछरेहटा येथे केलं. लग्नाच्या 1 वर्षानंतर तिली टीबीचा आजार असल्याचं निदान झालं. त्यामुळे नवऱ्यानं तिला माहेरी सोडलं, पण उपचारानंतर पुन्हा समज घालून मुलीच्या संसाराची घडी बसवून दिली.

# तुमच्या सीमवरून अश्लील व्हिडिओ व्हायरल होत आहेत.. महिलेला केले व्हिडिओ कॉलवर अटक

■अमरावती। प्रतिनिधी:

शहरातील गाडगेनगर भागातील एका महिलेवर 'डिजिटल अरेस्ट' करून तब्बल १७ लाख २० हजार रुपये उकळण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. १९ ते २६ ऑगस्टदरम्यान घडलेल्या या फसवणुकीत सायबर भामट्यांनी महिलेला व्हिडिओ कॉलद्वारे अटकेची भीती दाखवत तिच्याकडून रक्कम उकळली. महिलेच्या तक्रारीवरून सायबर पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध फसवणूक व आयटी ॲक्ट अंतर्गत गुन्हा नोंदविला आहे.

याप्रकरणी सुजाता नामक महिलेच्या तक्रारीनुसार, १९ ऑगस्टला या महिलेला मुंबई कुलाबा पोलिस असल्याचे भासवत एका व्यक्तीने फोन केला. तुमच्या आधार कार्डवरून घेतलेल्या सीमवरून अश्लील व्हिडिओ व्हायरल होत आहेत, असे तिला सांगण्यात आले. त्यानंतर व्हिडिओ कॉलवर पोलिसी वेशातील भामट्याने बनावट कागदपत्रे दाखवत अटकेची भीती दाखविली. अटकेच्या भीतीमुळे महिलेने सायबर भामट्यांच्या खात्यात वेगवेगळ्या प्रकारे एकूण १७ लाख २० हजार २३० रुपये पाठविले. रक्कम गमावल्यानंतर मात्र त्यांना फसवणुकीची जाणीव झाली. सायबर भामट्यांनी महिलेला गोल्ड लोन देणाऱ्या फायनान्स कंपनीकडे सोन्याचे दागिने गहाण ठेवण्यास प्रवृत्त केले. गोल्ड लोन मिळाल्यानंतर काही क्षणांतच ती रक्कम सायबर भामट्यांनी स्वतःच्या खात्यात ट्रान्सफर करवून घेतली. महिलेने एफडी मोडून ती रक्कमही अटक टाळण्यासाठी सायबर भामट्यांना पाठविली. सायबर भामट्याने फियार्दी महिलेची आर्थिक पार्श्वभूमी समजून घेतली. रोख आहे का, अशी विचारणा केली. सोन्याचे काही दागिने व एफडी असल्याचे महिलेकडून जाणून घेण्यात भामटे यशस्वी ठरले. फियार्दीचा मुलगा दुबईला नोकरी करीत असल्याचे जाणून घेतले.

# आधी व्हॉट्सअप स्टेट्सवर पत्नीला वाहिली श्रद्धांजली अन् नंतर..

■परभणी। प्रतिनिधी:

अवघ्या 2 दिवसांपूर्वी गणेशोत्सवाला सुरूवात झाली. घरोघरी वाजत-गाजत गणराय आले, सगळीकडे उत्साहाचं वातावरण होतं. गावागवातील लोकं गणपती भक्तीत तल्लीन असताना परभणीमध्ये मात्र अत्यंत हादरवणारी आणि आनंदाच्या वातावरण मिठाचा खडा टाकणारी अशी एक भयानक घटना उघडकीस आली आहे. आधी व्हॉट्सअपवर पत्नीला भावपूर्ण श्रद्धांजली वाहणारं स्टेटस ठेऊन एका पतीने त्याच्याच अर्धांगिनीची, पत्नीचा निर्घृण खून केल्याचा धक्कादाय प्रकार घडला आहे. परभणीच्या जिंतुर तालुक्यातील




सोनपुर तांडा येथे पतीनेच पत्नीचा अतिशय निर्घुणपणे खून केल्याने प्रचंड खळबळ माजली असून आरोपीला अटक करण्याची सर्व स्तरांतून मागणी होत आहे. विजय राठोड असे आरोपी पतीचे नाव असून विद्या असं मृत विवाहीत महिलेचे नाव आहे. सणासुदीच्या काळातच पतीने पत्नीची केलेली ही हत्या सर्वांनाच हादरवणारी असून त्यामुळे सगळेच हळहळत आहेत.

नेमकं काय झालं ?

मिळालेल्या माहितीनुसार, जिंतुर तालुक्यातील सोनपुर तांडा येथे हा प्रकार घडला. जिंतूर तालुक्यातील वाघी येथे राहणाऱ्या विजय राठोड याचं सोनपुर तांडा येथील विद्याशी लग्न झालं होतं. 3 ते 4 दिवसांपूर्वी विद्या आणि विजय यांच्या कोणत्या तरी कारणावरून वाद झाला होता. पती-पत्नीतील या भांडणानंतर विद्या ही तिच्या माहेरी रहायला गेली होती.

मात्र काल विद्या ही तिच्या वडिलांच्या शेतात होती, तेव्हाच तिचा पती विजय पुन्हा तिथे आला. आणि त्यांच्या पुन्हा वाद, शाब्दिक चकमक झाली. संतापाच्या भरात विजय याने त्याच्या हातात असलेल्या धारदार हत्याराने पत्नी विद्यावर हल्ला केला, तिची छाती, पोट, पाठ यावर हत्याराने 10 ते 12 सपासप वार केले. यामुळे विद्या गंभीर जखमी होऊ रक्तबंबाळ अवस्थेत खाली कोसळली. कुटुंबियांनी आजूबाजूच्या लोकांच्या मदतीने तिला उपचारांसाठी जिंतूर ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र तोपर्यंत बराच उशीर झाला होता. तेथील वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रमोद पारवे यांनी विद्या हिला तपासले आणि मृत घोषित केले.

विद्याच्या अकस्मात मृत्यूमुळे कुटुंबियांवर तर दुःखातचा डोंगर कोसळला. रुग्णालयात नातेवाईकांनी एकच हंबरडा फोडला. विद्याची निर्घृण हत्या करणाऱ्या तिच्या पतीला तत्काळ अटक करून कठोरात कठोर शिक्षा द्यावी अशी मागणी कुटुंबियांनी केली आहे. धक्कादायक गोष्ट म्हणजे विद्याला मारण्यापूर्वी विजय याने त्याच्या व्हॉट्सअप स्टेटसवर पत्नीचा फोटो आणि भावपूर्ण श्रद्धांजली असं लिहीलेलं स्टेटस ठेवले होते.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com